# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | सोमवार । दि. १० ऑगस्ट २०२६ । अंक ६५। पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## कोलाड उड्डाण पुलावर ट्रेलर पलटी



**कोलाड :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कोलाड उड्डाण पुलाला संरक्षण कठडे नसल्याने कॉईल घेऊन जाणारा ट्रेलर पलटी झाल्याची घटना घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जिवीत हानी झालेली नाही. मात्र, ट्रकचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-गोवा महामार्गावरून पान २ वर

## अलिबागचा सुपुत्र झाला पायलट



**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील विराज बैकर याने अवघ्या विसाव्या वर्षी पायलट होण्याचा मान पटकावला आहे. विराज बैकर याचे पायलट होण्याचे स्वप्न होते. ही गोष्ट त्याच्या आई-वडिलांच्या लक्षात येताच त्यांनी खूप मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मुलाचे स्वप्न पुर्ण करण्यास मदत केली. विराजने बारावीनंतर बारामतीमध्ये एंट्रन्स एक्झाम पान २ वर

### मुंबई-गोवा महामार्ग

# राजकीय हस्तक्षेपामुळे रखडला

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा आरोप

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गेल्या १७ वर्षांपासून रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गाच्या पाहणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे रविवारी (दि.९) रायगड दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी सर्व सत्ताधारी नेत्यांवर टीका केली. राजकीय हस्तक्षेपामुळे हा महामार्ग रखडला असल्याचे राज ठाकरेंनी स्पष्ट केले. तसेच, यावेळी त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह स्थानिक नेत्यांचाही उल्लेख केला.


मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे रविवारी रायगड दौऱ्यावर होते. त्यांच्या हस्ते पनवेल आणि माणगाव येथे मनसेच्या कार्यालयांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांना मुंबई-गोवा महामार्गाबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारले असता त्यांनी स्थानिक नेत्यांसह केंद्रीय मंत्री यांच्यावर टिका केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, राजकीय हस्तक्षेपामुळे मुंबई-गोवा महामार्ग होत नाही. मी मागे याबाबत नितीन गडकरींनाही फोन केला होता. ते म्हणाले होते की, ठेकेदार कंटाळून निघून गेले आहेत.

नितीन गडकरी हे रस्ते विभागाचे केंद्रीय मंत्री आहेत. ते कंत्राटदारांबद्दल कंटाळून निघून गेले असे बोलत असतील तर ते कोणाला कंटाळून निघून गेले? असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले, आतापर्यंतची पद्धत अशी आहे की, तुम्हाला रस्ता बांधायचा असेल तर जमिनीचे संपादन सरकारने करून द्यायचे असते. हे सगळे रस्ते करत असताना हीच समस्या निर्माण झाली. सरकारने जमिन संपादित करून दिली नाही. कंत्राट दिले, टक्केवारी दिली. वर्षानुवर्षे हेच सुरू आहे. मी आता नवीन बांधलेल्या रस्त्यावरून आलो, काय अवस्था आहे या रस्त्याची? नवीन रस्त्याची ही अवस्था असेल तर बायपासची गरज काय? विकास करताना टक्केवारीचाच विचार केला जात आहे. आमच्या जमिनी कशा विकल्या जातील हाच व्यवहार सुरू आहे. आता सध्या तिसऱ्या मुंबईच सुरू आहे. त्यामध्ये एज्युकेशनल सिटी, मेडिकल सिटी, डेटा सेंटर, ग्लोबल संस्था, आंतरराष्ट्रीय विद्यापीठ असणार आहेत. परंतु, हे आपल्या मुलांनाही माहिती नाही. येथील स्थानिक माजी जमीन मालक म्हणूनच येथे राहणार असून, त्यांच्या समोर ही तिसरी मुंबई तयार होणार आहे. या तिसऱ्या मुंबईबाबत पेण, पनवेलसह संपुर्ण रायगडच्या मुलांना आपण तयार करतोय का? आता शहरे उभी करायची, रस्त्यांची वाट लावायची आणि जमिनी विकण्याचा धंदा सुरू आहे. विकासाला विरोध करायचा नाही; परंतु, कोकणातील विकास पाहिला तर असा विकास नको असे वाटते, असा संताप राज ठाकरेंनी व्यक्त केला.

### स्थानिक नेत्यांवर आगपाखड

महाराष्ट्रातील पोरांची प्रगती होत नसेल तर ही जमीन चाटायची आहे का? विकास कुठे होणार आहे, हे स्थानिक आमदार आणि खासदारांना माहित आहे. मग ते तिथे जमिनी विकत घेणार. त्यानंतर सरकार अदानी वगैरेंना या जमिनी विकणार. सगळीकडे खा. तटकरे आणि त्यांची मुलगी, आ. ठाकूर आणि त्यांचा मुलगा, हेच सुरू आहे. हे आमच्या लोकांना समजत नाही, असे म्हणत राज ठाकरे यांनी स्थानिक नेत्यांवर आगपाखड केली.



### वेधक

## डिझेल दरवाढीने मच्छिमार संकटात

**रायगड :** सध्या शासनाकडून मासेमारीसाठी सवलतीच्या दराने मिळणारा डिझेल महाग झाला आहे. सरकारने मच्छिमारांना घाऊक डिझेल खरेदीदार ठरविण्यात आले आहे. त्यामुळे किरकोळ बाजारात मिळणाऱ्या ९६ ते ९७ रुपये लीटर ऐवजी घाऊक डिझेल १०८ रुपये दर मोजावे लागत आहेत. त्यामुळे मच्छिमारांना चढ्या दराने डिझेल खरेदी करावे लागत आहे. याचा आर्थिक फटका मच्छिमारांना बसत आहे. त्यामुळे मच्छिमारांमध्ये असंतोष आहे. त्याचप्रमाणे शासनाकडून मच्छिमारांना दिला जाणारा नियमित डिझेल कोटा आणि अनुदान वेळेत मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. तर, बंदी नंतर एकाचवेळी मोठ्या पान २ वर

## राज्यभरात दुधाचे दर वाढणार

**मुंबई :** गायीच्या आणि म्हशीच्या दुधाच्या दरांमध्ये ११ ऑगस्टपासून वाढ होणार आहे. मुंबईसह राज्यभरात दुधाचे दर वाढणार आहेत. दूध उत्पादक संघ आणि प्रोसेसर्स वेलफअर असोशिएशनच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत खासगी दूध डेअरींचे प्रतिनिधीही उपस्थित होते. असोसिएशनचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. त्यामध्ये गायीच्या आणि म्हशीच्या दुधाच्या प्रति लिटर दरांत वाढ करण्याच्या निर्णयावर एकमत झाले. गायीचे आणि म्हशीचे दूध हे प्रति लिटर दोन रुपयांनी महाग होणार आहे. असोसिएशनच्या माहितीनुसार डिझेलच्या किंमतींसह दुध प्रक्रियेचा तसेच इतर खर्चही वाढला आहे.

## बारामतीत पुन्हा विमान दुर्घटना

**पुणे :** बारामतीमध्ये पुन्हा एकदा एका शिकाऊ विमानाचा अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. हे विमान बारामतीच्या एअरफील्डवर प्रशिक्षण सत्रादरम्यान धावपट्टीवरून वळण घेत असताना घसरल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. प्रशिक्षणाच्या सरावादरम्यान ही घटना घडली आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. या विमानाला काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यानंतर हे विमान धावपट्टीवरून घसरल्याचे सांगितले जात आहे. पुणे ग्रामीण पोलिसांच्या माहितीनुसार, अपघातावेळी विमानात कॅप्टन चिराग शशिकांत डोईफोडे आणि अभिजित जुंद्रे हे दोघेजण होते. मात्र, त्यात कोणालाही दुखापत झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे.

### रुग्णांच्या आहाराची जबाबदारी

## महिला बचतगटांवर

■ २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या रुग्णालयांचे मिळणार काम

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्हा, उपजिल्हा आणि ग्रामीण भागांतील सरकारी रुग्णालयांत रुग्णांना आहार देण्याची जबाबदारी आता महिला बचतगटांवर सोपविण्यात आली आहे. २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या रुग्णालयांतील आहार सेवा महिला बचत गटांमार्फत चालविण्यास सरकारने मान्यता दिली आहे. राज्याच्या महिला धोरणांअंतर्गत महिलांना रोजगार व उद्योजकतेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच रुग्णांना दर्जेदार, पौष्टिक आणि वेळेवर आहार मिळावा, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे.

विविध सरकारी रुग्णालयांत आहार सेवा खासगी संस्थांकडून पुरविली जाते. मात्र सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार आता हे काम संबंधित तालुक्यातील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (एमएसआरएलएम) नोंदणीकृत व पात्र महिला बचत गटांकडे सोपविले जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील उद्योजकतेला चालना मिळण्याचे अपेक्षा सरकारकडून व्यक्त करण्यात आली आहे.

### १०० गुणांच्या निकषांवर होणार मूल्यमापन

महिला बचतग गटांची निवड ही गुणवत्तेवर आधारित होणार असून यामध्ये बचत गटाची कामगिरी, आहार सेवा व उद्योजकतेचा अनुभव, मनुष्यबळ, आर्थिक क्षमता आणि सामाजिक विश्वासार्हता या पाच निकषांच्या आधारे गुणांकन ठरणार आहे. १०० पैकी ८० किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवणारे गट यासाठी पात्र ठरणार आहेत, तर ७० ते ७९ गुण मिळवणाऱ्या बचतग गटांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक रुग्णालयासाठी १० बचत गटांचे पॅनेल तयार करण्यात येणार आहे. त्यातील सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या गटाला एक वर्षासाठी कार्यादेश देण्यात येतील. समाधानकारक काम केल्यास मुदतवाढ दिली जाणार असून काम असमाधानकारक असल्यास पुढील गटाला संधी मिळेल.

### एका रुग्णामागे १९१ रुपये

आहार सेवेचा अंदाजित दर सरकारने निश्चित केला असून प्रति रुग्ण प्रतिदिन मूलभूत आहारासाठी १४५ रुपये, इंधन, मनुष्यबळ व अन्य खर्चांसाठी २९ रुपये आणि महिला बचत गटांसाठी किमान १० टक्के नफा ग्राह्य धरून १९१.४० रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. अन्न-सुरक्षा व स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास ५०० रुपयांपासून ५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाणार आहे. योजनेच्या अंमबजावणीसाठी जिल्हास्तरीय निवड व देखरेख समिती तसेच विभागीय पुनरावलोकन समिती स्थापन करण्यात येणार आहे.

● (छायाचित्र : समीर मालोदे)



● आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण, समृद्ध संस्कृतीचे जतन आणि जल, जंगल, जमिनीच्या संवर्धनाचा संदेश देत जागतिक आदिवासी दिन अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथील क्षात्रैक्य समाज सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला आदिवासी संघटनेचे अध्यक्ष दत्ता नाईक, भगवान नाईक, माजी अध्यक्ष मुकेश नाईक आदिंसह विविध मान्यवर व तालुक्यातील बहुसंख्य आदिवासी बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्ता चुकलेल्या पर्यटकांची सुटका

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

माची प्रबळगडावर चढाईसाठी गेलेल्या दोन १७ वर्षीय अल्पवयीन पर्यटकांचा रस्ता चुकल्याने ते डोंगर परिसरात अडकले होते. घाबरलेल्या अवस्थेत त्यांनी तातडीने मदतीसाठी ११२ क्रमांकावर संपर्क साधला. माहिती मिळाल्यानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पान २ वर

## अलिबागकरांची ‘लाईफ सायकल’ला काळजी

■ बालकांसह ज्येष्ठांची मोफत आरोग्य तपासणी

■ ॲड. मानसी म्हात्रे यांची संकल्पना



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**


अलिबाग शहराच्या आरोग्याचा विचार केवळ आजारपणानंतरच्या उपचारांपुरता मर्यादित न ठेवता, चिमुकल्यांच्या आरोग्याची पायाभरणी करण्यापासून ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घेण्यापर्यंत संपूर्ण ‘लाईफ सायकल’चा विचार अलिबाग नगरपरिषदेने पुढे आणला आहे. नगरपरिषदेच्या आरोग्य विभागातर्फे विविध प्रभागांमध्ये घेण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिरांमध्ये शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांसाठी २५० पालकांनी आपल्या मुलांना तपासणीसाठी आणले, तर ज्येष्ठ नागरिकांच्या शिबिरात ३७ ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. हा उपक्रम अलिबागच्या उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला.

यावेळी बालकांसाठी ब्राह्मण आळी येथील यूएचडब्ल्यूसी, शास्त्रीनगर येथील यूएचडब्ल्यूसी तसेच कन्या शाळेसमोरील यूएचडब्ल्यूसी येथे आरोग्य शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये डॉ. विनायक पाटील, डॉ. सागर खेदु, डॉ. राजेंद्र चांदोरकर, डॉ. मैत्रयी तिवारी, डॉ. सरोदे, आणि डॉ. मनोज कोळी यांनी वैद्यकीय सेवा दिली. तर, ज्येष्ठ नागरिकांसाठी अलिबाग येथील ज्येष्ठ नागरिक भवनात मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. यावेळी डॉ. अपूर्वा पाटील, डॉ. मंजिरी इंगळे, डॉ. श्रेयस नाईक, डॉ. वैभव चौलकर आणि डॉ. सचिन जायभाय यांनी ज्येष्ठ नागरिकांची तपासणी केली. पान २ वर

## रोहित पवारांच्या दाव्यामुळे खळबळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडे पुन्हा एकदा अर्थखाते सोपवले जाणार असल्याच्या चर्चा मागील काही दिवसांपासून सुरू आहेत. मात्र, अद्याप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे अर्थखाते देण्यात आलेले नाही. त्याच मुद्यांवर बोलताना आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एक मोठे वक्तव्य केले आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला अर्थखाते मिळण्याची शक्यता कमी आहे, असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या गोटात खळबळ उडाली आहे.



### वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली मुख्य कार्यालयास भेट | आधुनिक बँकिंगचा विशेष गौरव

# आरबीआयकडून आरडीसीसीचे विशेष कौतुक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कामाची थेट भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेतली आहे. त्यांनी, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्य सहकार क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरू शकते, असे गौरवोद्गार काढले.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मुख्य कार्यालयातील डिपार्टमेंट ऑफ रेग्युलशनचे जनरल मॅनेजर विकासकुमार साहू, असिस्टंट जनरल मॅनेजर धनंजय भासे आणि शैलेश इंगळे यांच्या शिष्टमंडळाने रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अलिबाग येथील मुख्य कार्यालयाला भेट देऊन बँकेच्या कामकाजाचा अभ्यास दौरा केला. यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी बँकेच्या वाटचालीचे सविस्तर सादरीकरण केले. नाबार्डचे महाराष्ट्र रिजनल ऑफिसचे एजीएम नवल कन्नोर व बँकेचे पान २ वर



> सहकार क्षेत्रातील बँकांनी व्यवसायवृद्धीबरोबरच वित्तीय समावेशन, संस्थात्मक सक्षमीकरण आणि गुणवत्तापूर्ण बँकिंग सेवांवर सातत्याने भर देणे आवश्यक आहे. आरडीसीसी बँकेने या दिशेने केलेले प्रयत्न उल्लेखनीय असून, बदलत्या बँकिंग व्यवस्थेशी सुसंगतपणे स्वतःमध्ये सातत्याने सुधारणा करण्याचा दृष्टिकोन निश्चितच प्रशंसनीय आहे. या क्षेत्रात आरडीसीसी बँकेने उभारलेले कार्य सहकार क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरू शकते. या यशामागे बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांचे विकासाभिमुख नेतृत्व, संचालक मंडळ आणि व्यवस्थापन यांची दूरदृष्टी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे सातत्यपूर्ण आहेत.
>
> – **विकासकुमार साहू,** डिपार्टमेंट ऑफ रेग्युलशनचे जनरल मॅनेजर, आरबीआय मुख्य कार्यालय

### बँकेचे कार्य, रोल मॉडेल कार्य

आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा ॲनालिटिक्स, डिजिटल गव्हर्नन्स, अधिक सक्षम सायबर सुरक्षा आणि आधुनिक बँकिंग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहकांना अधिक सुरक्षित, जलद आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचा बँकेचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच, बँकेने सहकारी संस्थासाठी केलेले कार्य देशातील रोल मॉडेल कार्य ठरेल, असे विकासकुमार साहू यांनी आपले मत व्यक्त करीत बँकेचे अभिनंदन केले.




## पान १ वरून

## अलिबागचा सुपुत्र झाला पायलट

परीक्षा उत्तीर्ण होऊन मेडिकल टेस्ट आणि फ्लाईंग ट्रेनिंग दोन वर्षात पूर्ण केली. त्यानंतर कार्व्हर इव्हिनेशन म्हणून पायलट झाला. यावेळी बोलताना विराज म्हणाला की, ‘‘मी पायलट झालो, त्यामागे माझे वडील राजेश बैकर व आई वैशाली बैकर यांच्यासह माझ्या शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले, असे मत त्याने व्यक्त केले आहे. दरम्यान, आगरी समाजाचे सुपुत्र कुमार विराज बैकर याने वैमानिक प्रशिक्षण विक्रमी वेळेत यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्याचे अभिनंदन करण्यासाठी त्याच्या निवासस्थानी सुशांत पाटील, रमेश तुंनतुने, मनोज ठाकूर, अरुण पाटील, प्रदीप परांगे आदींनी भेट दिली.

## रस्ता चुकलेल्या पर्यटकांची सुटका

बीट मार्शल पोलीस हवालदार अमर भालसिंग आणि प्रदीप पोपेटे यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अभिजीत व्हरांबळे आणि सरदार वसेकर यांच्या पुढाकाराने बचावकार्य सुरू करण्यात आले. यावेळी माची प्रबळ गावातील रहिवासी नवनाथ पारधी आणि हरिश्‍चंद्र पारधी यांच्यासह पोलीस अंमलदार, निसर्ग मित्र संस्था पनवेल आणि हेल्प फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांची मदत घेण्यात आली. डोंगरातील वाटा आणि परिसराची स्थानिकांना असलेली माहिती बचावकार्यात महत्त्वाची ठरली. शोधपथकाने योग्य दिशेने शोधमोहीम राबवत दोन्ही मुलांचा ठावठिकाणा शोधून काढला. त्यानंतर दोन्ही अल्पवयीन पर्यटकांना सुरक्षितपणे डोंगरावरून खाली आणण्यात आले. त्यांची प्रकृती ठीक असल्याची खात्री केल्यानंतर त्यांना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूपपणे देण्यात आले. पोलिसांच्या तत्परतेमुळे तसेच ग्रामस्थ आणि बचाव पथकाच्या समन्वयामुळे मोठी दुर्घटना टळली.

## अलिबागकरांची ‘लाईफ सायकल’ला काळजी

यावेळी नगरसेविका शैला भगत, स्वीकृत नगरसेवक जमाल सय्यद, आरोग्य विभाग प्रमुख प्रियांका मोरे, नगर अभियंता संतोष मुंढे, स्वच्छता निरीक्षक धनंजय आंब्रे, शहर समन्वयक आर्या जाधव, मुकादम प्रकाश तांबे, अक्षय गायकवाड तसेच संपूर्ण आरोग्य विभाग व अलिबाग नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. मानसी म्हात्रे यांनी, ‘‘अलिबागकरांचे आरोग्य सुदृढ आणि चांगले राहिले पाहिजे, या उद्देशाने आरोग्यविषयक उपक्रमांना प्राधान्य दिले जात असल्याचे सांगितले. तसेच, आरोग्य शिबिरांसोबतच शहर स्वच्छ आणि रोगराईमुक्त ठेवण्यासाठी दर शनिवारी एका प्रभागात स्वच्छता अभियान राबविण्याचा संकल्पही नगरपरिषदेने केला आहे. अलिबाग हे पर्यटकांचे आवडते ठिकाण असल्याने शहराची स्वच्छता आणि सुसज्जता महत्त्वाची आहेच; मात्र, सुंदर अलिबागसोबत निरोगी अलिबाग घडविणेही तितकेच आवश्यक आहे, असे देखील ॲड. म्हात्रे यांनी स्पष्ट केले.

## आरबीआयकडून आरडीसीसीचे विशेष कौतुक

उपाध्यक्ष सुरेश खैरे हे देखील उपस्थित होते. यावेळी, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वित्तीय समावेशन, ग्रामीण भागातील बँकिंग सेवांचा विस्तार, सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात आलेले उपक्रम, आधुनिक बँकिंग व्यवस्था तसेच व्यवसायवृद्धीची दखल घेत बँकेच्या कामकाजाचे कौतुक करण्यात आले. वित्तीय समावेशनाच्या क्षेत्रात बँकेने केलेल्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली. त्याचबरोबर बँकेच्या ८ हजार कोटींहून अधिक व्यवसायाचा, सातत्यपूर्ण व्यवसायवृद्धीचा, आधुनिक बँकिंग सेवा, डिजिटल परिवर्तन, रिस्क मॅनेजमेंट, सायबर सुरक्षा, ग्राहकाभिमुख सेवा, तसेच नियामक अपेक्षांनुसार विकसित करण्यात आलेल्या सक्षम व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी बँकेने सातत्याने राबविलेल्या उपक्रमांचा आणि संस्थांचे संगणकीकरण देशात सर्वप्रथम करून त्यांना आधुनिक बँकिंग व्यवस्थेशी जोडण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराचाही यावेळी विशेष उल्लेख करण्यात आला.

यावेळी बोलताना विकासकुमार साहू यांनी, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम यांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे ग्रामीण उद्योजकता, २०,००० पेक्षा अधिक महिला बचतगट, स्वयंरोजगार आणि सूक्ष्म उद्योगांना बँकेने दिलेल्या पाठबळाचे कौतुक केले. तसेच, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी अशा योजनांची प्रभावी अंमलबजावणी महत्त्वाची आहे. बँकेने केवळ शहरी भागातच नव्हे तर जिल्ह्यातील कशेळे, मजगाव, नाते, विन्हेरे, विळे, राजपुरी, संदेरी अशा ग्रामीण तथा दुर्गम भागांमध्ये शाखा विस्तार करून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचविण्याच्या आणि ग्रामीण भागातील प्रत्येक घटकाला औपचारिक बँकिंग व्यवस्थेशी जोडण्याचा बँकेचा प्रयत्न हा वित्तीय समावेशनाचा प्रभावी नमुना असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

## कोलाड उड्डाण पुलावर ट्रेलर पलटी

रविवारी (दि.९) पहाटे ५.०० वाजण्याच्या सुमारास कॉईल भरून जाणारा ट्रेलर कोलाड येथील उड्डाण पुलावरून कलंडला. या ट्रेलर चालकाला उड्डाण पुलाला संरक्षण कठडे नसल्याने पुलाचा अंदाज न आल्यामुळे ट्रेलर पलटी झाला. सुदैवाने यात कोणतेही जिवीत हानी झालेली नाही. या अपघाताचा अधिक तपास कोलाड ठाण्याचे सपोनि भारत फार्णे यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड पोलीस करीत आहेत. दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम हे गेली सतरा वर्षे सुरू आहे; मात्र, ते आजतागायत पूर्णत्वावर नसल्याने दररोज अपघातांची मालिका सुरू आहे. तर, काही ठिकाणी उड्डाण पुलांचे अपूर्ण काम, तर काही ठिकाणे भयानक पडलेले खड्डे हे अपघातात कारणीभूत ठरत आहेत. जिल्ह्यातील आमदार, खासदार व मंत्री यांनी मंत्रालयात अधिकारी वर्गासमवेत आढावा बैठकीवर बैठका सुरू केल्या आहेत. मात्र, खड्डे आणि महामार्गाची दुरुती याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. या पुलाचे काम अपूर्णावस्थेत असून, संरक्षण कठडेही अपूर्ण आहेत. त्यामुळे या उड्डाण पुलावरून दोन्ही बाजूनी वाहतूक सुरु करून प्रवासी वर्गाच्या जीवाचा खेळ मांडला आहे, असेच एकंदरीत परिस्थिती वरून दिसून येत आहे.

## डिझेल दरवाढीने मच्छिमार संकटात

प्रमाणात मासेमारी होत असल्याने मासळीला योग्य दर मिळत नाही. मासेमारी व्यवसाय घाटयात चाललेला असतांना मासेमारीच्या ऐन हंगामात बंदीत वाढ केल्याने मच्छिमारांवर अधिकच संकट येणार असल्याचे मच्छिम ाराचे म्हणणे आहे. दोन महिन्या ऐवजी यावर्षी अडीच महिन्याचा बंदी काळ झाल्याने मच्छिमारांवर अधिक आर्थिक संकट कोसळले आहे.

एकाच दिवशी मोठ्या प्रमाणात बोटी आल्याने मासळीचा दर ही कमी मिळण्याची होण्याची शक्यता ही येथील मच्छिमारा कडून व्यक्त केले आहे. यावर्षी राज्यातील मत्स्यसाठ्याचे संवर्धन आणि एकूण मत्स्य उत्पादन वाढीसाठी दरवर्षी लागू असणारा पावसाळी मासेमारी बंदीच्या कालावधी राज्य सरकारने आणखी १५ दिवसांची वाढ केली आहे. त्यामुळे यावर्षी ३१ जुलै ऐवजी आता १५ ऑगस्ट पासून मासेमारीचा नवा हंगाम सुरू होणार आहे. याची घोषणा राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी विधानसभेत केली आहे. या बंदी कालावधी वाढीने मच्छिमारांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू असून मच्छिमारांचे नुकसान होणार असल्याची भीती व्यक्त केली आहे. सध्या मासेमारीसाठी सवलतीच्या दराने मिळणारा डिझेल महाग झाला आहे. मच्छिमारांना घाऊक डिझेल खरेदीदार ठरविण्यात आल्याने डिझेल दर लिटर मागे १०८ रुपये झाला आहे. त्याचप्रमाणे मच्छिमारांना नियमित डिझेल कोटाही मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. तर बंदी नंतर एकाचवेळी मोठ्या प्रमाणात मासेमारी होत असल्याने मासळीला योग्य दर मिळत नाही. मासेमारी व्यवसाय घाटयात चाललेला असतांना मासेमारीच्या ऐन हंगामात बंदीत वाढ केल्याने मच्छिमारांवर अधिकच संकट येणार असल्याचे मच्छिमारांचे म्हणणे आहे. अडीच महिन्याचा बंदी काळ झाल्याने मच्छिमारांवर आर्थिक संकट येण्याची तसेच एकाच दिवशी मोठ्या प्रमाणात बोटी आल्याने मासळीचा दर ही कमी होण्याची शक्यता असल्याचे मत मच्छिमार हर्ष पावशे यांनी व्यक्त केले आहे.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **दिशा पॅथॉलॉजी लॅब, मध्ये नोकरीची संधी!** १) नर्स १ पद(चोंढी शाखा ) अनुभवी / फ्रेशर्स दोन्ही अर्ज करू शकतात. वेळ : डे शिफ्ट २) डिलिव्हरी बॉईज २-पदे -(अलिबाग शहर) स्वत:चे टू-व्हीलर व वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. संपर्क : ८५५२८ ५५२८८ दिशा पॅथॉलॉजी लॅब, अलिबाग

● **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक श्री. मंगेश दत्तात्रेय सावंत यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे

| सर्व्हे नं | प्लॉट नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| १४२ | १२ | २-४२-०० | २४-२० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: १०/०८/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बोरिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक श्री. मोहन हरिश्चंद्र भोईर यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे

| सर्व्हे क्र | प्लॉट नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| ६० | ८ | ०-५९-००<br>यापैकी विकत दिलेले क्षेत्र<br>०-३०-०० | ०-३० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: १०/०८/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक अमित महादेव राजपूत यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव, ता. अलिबाग | १६४७ | ०-३५-४० बागायत<br>०-०४-२० पो.ख.<br>०-३९-६० एकुण | ९.५७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अमित महादेव राजपूत यांच्या नावे असणारे बागायत एकुण क्षेत्र ०-०७-८० हे. आर., आकार २ रू ११ पैसे जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक- ०९/०८/२०२६

**ॲड. राहूल रमेश नाईक**
मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

### नोटिस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे खानवळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्रीमती लक्ष्मी ओ जॉगरे यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी- विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हरकत, दावा, लीज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकिलांकडे ही जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे खानावळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| खानावळे, ता. पनवेल, जि. रायगड | १८/अ/२२ | ३.३१.०० | ३३.१० |

दि. ०९/०८/२०२६

**ॲड. समीर सदानंद भालेकर**
श्री. चिन्मय गौरंग गृहसंकुल,
सी. विंग, श्री. देव सिद्धेश्वर,
रूम. नं. ३०५, ३ रा मजला,
उरण नाका, पनवेल, ४१०२०६
मो.नं. ९७६६३४७१४४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बोरिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक श्री. मोहन हरिश्चंद्र भोईर यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे

| सर्व्हे क्र | प्लॉट नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| ६० | ८ | ०-५९-००<br>यापैकी विकत दिलेले क्षेत्र<br>०-३०-०० | ०-३० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: १०/०८/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमच्या अशिलाने मौजे तुरुंबाडी, ता. म्हसळा, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत विद्यमान मिळकत मालक श्री. अशोक केरु पोतदार यांच्या अविभाज्या हिश्याच्या मिळकती कायम विकत घेण्याची बोलणी करण्यात आली असून बयाणाचिठ्ठी करण्यात आली असून बयाणा रक्कम देण्यात आलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे. मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मौजे तुरुंबाडी, ता. म्हसळा येथील मिळकत**

| गट नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पै.) | लागवड |
|---|---|---|---|
| १४९ | ४-२१-०० पैकी १-४०-३३ | ०.२७ | गवतपड |
| १०४ | ०-८४-०० पैकी ०-२८-०० | ०.३१ | गवतपड |
| १०९ | १-०१-०० पैकी ०-३३-६६ | १.२६ | |
| ७८ | ४-०३-०० पैकी १-३४-३३ | १.१३ | |

तरी वरील जमीन मिळकतीबाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकीत दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास तसेच नमुद मिळकतीच्या हद्दीखुणांवरुन कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येऊन माझी खात्री पटवून घ्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संबंधीत मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दि. ११/०८/२०२६

**ॲड. प्रगती पोतदार**
मु. टिळक रोड पो.
ता. श्रीवर्धन, जि. रायगड.
खरेदीदाराचे ॲडव्होकेट
फो. नं. ८९८३७३७६९९

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमच्या अशिलाने मौजे तुरुंबाडी, ता. म्हसळा, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत विद्यमान मिळकत मालक श्री. अशोक केरु पोतदार यांच्याकडून कायम विकत घेण्याची बोलणी करण्यात आली असून बयाणाचिठ्ठी करण्यात आली असून बयाणा रक्कम देण्यात आलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे. मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मौजे तुरुंबाडी, ता. म्हसळा येथील मिळकत**

| गट नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पै.) | लागवड |
|---|---|---|---|
| १६२ | ०-२६-५० | ०.२७ | गवतपड |
| १५९ मधील खाते क्र १०० | ०-४९-०० | ०.६२ | गवतपड |
| १५७ | ०-२२-०० | ०.०९ | गवतपड |
| १४८ | ०-६३-०० | ०.२० | गवतपड |

तरी वरील जमीन मिळकतीबाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकीत दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास तसेच नमुद मिळकतीच्या हद्दीखुणांवरुन कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येऊन माझी खात्री पटवून घ्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संबंधीत मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दि. ११/०८/२०२६

**ॲड. प्रगती पोतदार**
मु. टिळक रोड पो.
ता. श्रीवर्धन, जि. रायगड.
खरेदीदाराचे ॲडव्होकेट
फो. नं. ८९८३७३७६९९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकतीचे मालक श्री. मंगेश दत्तात्रेय सावंत यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे

| सर्व्हे नं | प्लॉट नं | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| १४२ | १२ | २-४२-०० | २४-२० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: १०/०८/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमच्या अशिलाने मौजे रोहिणीकोंड, ता. म्हसळा, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत विद्यमान मिळकत मालक श्री. अशोक केरु पोतदार यांच्या सामाईक मिळकतीमधून श्री. अशोक केरू पोतदार यांच्या अविभाज्या हिश्याच्या मिळकती कायम विकत घेण्याची बोलणी करण्यात आली असून बयाणाचिठ्ठी करण्यात आली असून बयाणा रक्कम देण्यात आलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे. मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मौजे रोहिणीकोंड, ता. म्हसळा येथील मिळकत**

| गट नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पै.) | लागवड |
|---|---|---|---|
| ६६ | ०-४६-०० पैकी ०-१५-३३ | ०.२७ | गवतपड |
| ६७ | २-५७-०० पैकी ०-८५-६६ | ०.३१ | गवतपड |

तरी वरील जमीन मिळकतीबाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकीत दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास तसेच नमुद मिळकतीच्या हद्दीखुणांवरुन कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येऊन माझी खात्री पटवून घ्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संबंधीत मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दि. ११/०८/२०२६

**ॲड. प्रगती पोतदार**
मु. टिळक रोड पो.
ता. श्रीवर्धन, जि. रायगड.
खरेदीदाराचे ॲडव्होकेट
फो. नं. ८९८३७३७६९९

### जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल जयराज आंबाजी तांडेल, रा.कासु, ता.पेण, जि.रायगड वगैरे यांचे खुद्द मालकीची व ताबाकब्जा वहिवाटीतील खालील वर्णनाची मिळकत मौजे पाटणी पांडापुर, ता.पेण, जि.रायगड येथे आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| पाटणी पांडापुर | १३७/२ | ०-३६-७० | ३.७५ |

वरील वर्णनाची मिळकत हया या जाहीर नोटीसीचा विषय असुन सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकती असे संबोधिले जाईल.

सदर मिळकत ही हया आमचे अशिलांच्या खुद्द मालकीच्या व ताबाकब्जा वहिवाटीतील आहेत. मात्र सदर मिळकतीचे ७/१२ पत्रकी लिलाबाई कृष्णा तांडेल, किरण बळिराम तांडेल, विनय बळिराम तांडेल, मंदा बळिराम तांडेल यांचे नावाच्या नोंदी आहेत. म्हणुन सदर मिळकतीचे मालकी हक्काचे ठरावाकरिता, मँडेटरी मनाई हुकूमाकरीता व निरंतरचे मनाई हुकूमाकरीता आमचे अशिलांनी पेण येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर साो न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ७०/२०१९ चा दावा दाखल केलेला असुन त्याचे कामकाज प्रलंबित आहे.

आमचे अशिल या जाहीर नोटीसीने आपणास कळवु इच्छितात की, सदर मिळकतींचे मालकी हक्काशी व ताब्याशी लिलाबाई कृष्णा तांडेल, वगैरे यांच्या काहीएक हक्क हितसंबंध नाही. असे असतानाही ते सदर मिळकतींचे ७/१२ त्यांची नावे असल्याचा गैरफायदा घेउन सदर मिळकती त्रयस्थ इसमांस विक्री करणार असल्याची खात्रीलायक माहिती आमचे अशिलांस प्राप्त झालेली आहे. म्हणुन नियमित दिवाणी दावा क्र. ७०/२०१९ चा अंतिम निकाल होईपर्यंत सदर मिळकतीबाबत कोणीही लिलाबाई कृष्णा तांडेल, वगैरे यांचे सोबत कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्रीचा व्यवहार, खरेदीखत, साठेकरार, गहाणखत, दान, बक्षिसपत्र, चा व्यवहार करु नये. तसा कोणताही व्यवहार कोणीही लिलाबाई कृष्णा तांडेल, वगैरे यांचेसोबत केलेला असल्यास अथवा केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. १०/०८/२०२६

सही
**ॲड. पुष्कर धनदास मोकल**
रा. ईशान्य बिल्डींग, बी-विंग, पहिला मजला,
फ्लॅट नं. १०३, महाजन हॉस्पिटलचे बाजुला,
चिंचपाडा, पेण, ता.पेण, जि.रायगड. मो.नं. ९८५०३६११७२

### पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरती जाहिरात २०२६
### संस्थेचे नाव :- खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ खोपोली संस्था कोड:- २७२४०३SC०१०
### शिक्षक पदभरती

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ खोपोली यांच्या व्यवस्थापनाकडील माध्यमिक शाळांमधील १९ रिक्त शिक्षक पदांसाठी मुलाखतीसह व निवड प्रक्रियेतून निवड करून नियुक्ती करण्यासाठी पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार पवित्र पोर्टलमार्फत पात्र उमेदवारांकडून विहित मुदतीत प्राधान्यक्रम घेण्यात येत आहेत. व्यवस्थापनाची सविस्तर जाहिरात व सविस्तर सूचना पाहण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या https://tait2025.mahatteacherrecruitment.org.in या पवित्र पोर्टलच्या संकेतस्थळास भेट द्यावी. विहित केलेल्या पात्रताविषयक अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी व्यवस्थापनाचे प्राधान्यक्रम दिलेल्या विहित मुदतीत नोंद (Lock) करावीत. तसेच पवित्र पोर्टलवरील सूचनांप्रमाणे वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही करावी.

**आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी /मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | आवश्यक आरक्षणनिहाय तपशील | TET/ CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | पदवीधर शिक्षक इ. ६ वी ते ८ वी | एकत्रित मानधन GT 6-8 (16000) | अनुदानित | गणित विज्ञान | इंग्रजी | बी.एस.सी.बी.एड/ बी.एस.सी.डी.टी.एड. | अनुसूचित जाती-१<br>अनुसूचित जाती (महिला)-१<br>अनुसूचित जमाती-१<br>इ.मा.व. (महिला)-१<br>एस.इ.बी.सी.-१<br>एस.इ.बी.सी.(महिला)-१<br>आ.दु.घ. (महिला)-१<br>खुला-४<br>खुला (महिला)-२<br>खुला (मा.सै.)-१<br>खुला (अंशकालीन)-१<br>(अस्थिव्यंग-१) | TET Paper 2 (Maths-Science) /CTET Paper 2 Science | १ |
| २ | मराठी | पदवीधर शिक्षक इ. ६ वी ते ८ वी | एकत्रित मानधन GT 6-8 (16000) | अनुदानित | गणित विज्ञान | इंग्रजी | बी.एस.सी.बी.एड/ बी.एस.सी.डी.टी.एड. | | TET Paper 2 (Maths-Science) /CTET Paper 2 Science | ४ |
| ३ | मराठी | पदवीधर शिक्षक इ. ९ वी ते १० वी | एकत्रित मानधन GT 9-10 (18000) | अनुदानित | गणित विज्ञान | इंग्रजी | बी.एस.सी.बी.एड | | - | २ |
| ४ | मराठी | पदवीधर शिक्षक इ. ९ वी ते १० वी | एकत्रित मानधन GT 9-10 (18000) | अनुदानित | गणित विज्ञान | मराठी | बी.एस.सी.बी.एड | | - | ३ |
| ५ | मराठी | पदवीधर शिक्षक इ. ९ वी ते १० वी | एकत्रित मानधन GT 9-10 (18000) | अनुदानित | भाषा (इंग्रजी) | - | बी.ए.बी.एड | | - | ८ |
| ६ | मराठी | पदवीधर शिक्षक इ. ९ वी ते १० वी | एकत्रित मानधन GT 9-10 (18000) | अनुदानित | भाषा (संस्कृत) | - | बी.ए.बी.एड | | - | १ |
| | | | | | | एकूण पदे | | | | १९ |

स्थळ- खोपोली
दि. ०९/०८/२०२६

**अध्यक्ष/सचिव**
**खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, खोपोली**

# आदिवासी एकतेचा कर्जतमध्ये जागर

## तालुक्यातील रस्ते तरुण, महिलांच्या गर्दीने फुलले

**| नेरळ | प्रतिनिधी |**

आंतरराष्ट्रीय आदिवासी दिनाच्या निमित्ताने कर्जत तालुक्यातील आदिवासी समाज आपल्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या अधिकाराचा जल्लोष करण्यासाठी रस्त्यावर उतरला होता. कर्जत तालुक्यातील रस्ते आदिवासी लोकांच्या गर्दीने फुलून गेले होते. तर कशेळे येथील मुख्य सोहळ्याला कर्जत तालुक्याचे आमदार महेंद्र थोरवे आणि राष्ट्रवादीचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे हे एकत्र आले होते.



कर्जत तालुका हा आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळखला जात असून येथे मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज वास्तव्य करून आहे. गेल्या नऊ वर्षांपासून कर्जत तालुक्यामध्ये ९ ऑगस्ट 'आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन'म्हणून आजरा केला जातो. आदिवासी समाजातील सर्व जाती यांनी एकत्र येत स्थापन केलेल्या समन्वय समितीच्या माध्यमातून आदिवासी दिनाचा सोहळा कर्जत तालुक्यात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने नेरळ पासून कर्जत आणि पुढे कशेळे अशी रॅली काढण्यात आली. या रॅलीची सुरुवात सकाळी नेरळ येथील कोतवालवाडी येथील हुतात्मा आधारस्तंभाला पुष्पहार अर्पण करून आदिवासी दिनाचे कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर रॅली नेरळ बाजारपेठ येथून छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचली, जिथे शिवरायांना अभिवादन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. पुढे हुतात्मा हिराजी पाटील चौक येथे आदिवासी कलाकार यांनी नृत्य सादर केली.तर येथे हुतात्म्यांना हार अर्पण करून रॅलीला पुढे प्रारंभ झाला. माथेरान नाका येथील हुतात्मा चौक येथे देखील हुतात्म्यांना अभिवादन करून ही रॅली कर्जतच्या दिशेने रवाना झाली. कर्जत येथे पोहोचल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर रॅली पुढे कशेळेच्या दिशेने निघाली.या रॅली चे प्रत्येक वाटेवर स्वागत केले जात होते.

या रॅलीचे विशेष आकर्षण म्हणजे आदिवासी समाजाचे पारंपरिक नृत्य, ढोल-ताशांचा गजर आणि रंगीबेरंगी वेशभूषा होती. विविध भागांतून आलेल्या आदिवासी बांधवांनी आपली परंपरा, संस्कृती आणि लोककला सादर करत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. पारंपरिक नृत्यप्रकार, गाणी आणि सांस्कृतिक सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर आदिवासी संस्कृतीच्या रंगात न्हाऊन निघाला.कर्जत मुरबाड रस्त्याने जाणाऱ्या आदिवासी दिनाच्या रॅली मध्ये अनेक ठिकाणी स्वागत आणि नाष्टा यांची व्यवस्था करण्यात आली होती.कशेळे येथील नाक्यावर आदिवासी समाजाच्या हक्क, परंपरा आणि संस्कृती जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच समाजातील तरुण पिढीने आपल्या संस्कृतीचे जतन करत शिक्षण आणि प्रगतीकडे वाटचाल करावी, असे आवाहन करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या उत्सवाच्या माध्यमातून आदिवासी समाजातील एकता, संस्कृतीचे जतन आणि प्रबोधन यांचा संदेश देण्यात आला.

### थोरवे - घारे हे एकाच व्यासपीठावर

आदिवासी दिनाच्या कार्यक्रमात आमदार महेंद्र थोरवे आणि राष्ट्रादी काँग्रेस पक्षाचे जिल्ह अध्यक्ष सुधाकर घारे हे एकत्र आले.घारे यांनी भाषणात आमदार महेंद्र थोरवे असे नाव घेतले पण आमदार महेंद्र थोरवे यांनी घारे यांचे नाव घ्यायचे टाळले.तर आदिवासी भवन पुढील वर्षी ९ ऑगस्टपूर्वी खुला होईल आणि दिमाखात आजच्या तारखेला उद्घाटन केले जाईल असे जाहीर केले. त्यानंतर काही सेकंद आमदार थोरवे हे डिजे चे तालावर नृत्यात सहभागी झाले.त्याआधी घारे हे व्यासपीठावरून खाली उतरले होते.तर प्रमुख मान्यवर निघून गेल्यानंतर किमान तासभर आदिवासी समाजाकडून आपली नृत्य कला तेथे सादर केली.

## निवडक



### कोलाड येथे मोफत चष्मा वाटप

**कोलाड :** रोहा तालुक्यातील लायन्स क्लब ऑफ कोलाड ही सेवाभावी संस्था गेली पाच ते सहा वर्षापासून कोलाड परिसरात तसेच तळागाळात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य, पर्यावरण,सह विविध क्षेत्रात उत्तमरित्या कार्य करत असून तर तळागाळातील सर्व सामान्य घटकाला विविध सेवेचा लाभ मिळावा यासाठी सदैव प्रयत्नशील ही सेवाभावी संस्था काम करत असल्याने मागील २९ जुलै रोजी कोलाड लायन्स क्लब, लायन्स हेल्थ फाउंडेशन अलिबाग तसेच प्रमोद म्हसकर सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व मोती बिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात दोनशेहून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली तर १५ रुग्णांवर मोफत मोती बिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. तर एका रुग्णांवर प्रमोद म्हसकर यांच्या विशेष सहकार्यातून तांत्रिक शस्त्रक्रिया करण्यात आली असून जवळपास शंभर ते सव्वाशे लाभार्थ्यांना प्रमोद म्हसकर यांच्या माध्यमातून मोफत चष्मा वाटप करण्यात करण्यात आले.

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पुढाकार

**पाली :** निशांत पवार, पर्यावरणपूरक सण आणि उत्सव



साजरे करण्याची चळवळ घरोघरी पोहोचावी या उद्देशाने पाली शहरामध्ये एका विशेष आणि स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आयुष्य व्यसनमुक्ती केंद्र पुणे यांचे अध्यक्ष तथा भाजप सुधागड तालुका युवा मोर्चाचे सरचिटणीस अंकुश आपटे यांच्या संकल्पनेतून आणि सौजन्यातून सुधागड वासियांसाठी अत्यंत सुबक आणि मनमोहक शाडूच्या गणेशमूर्ती अवघ्या ११ रुपयांच्या नाममात्र दरात उपलब्ध करून दिल्या जात आहेत. सुधागड तालुका भाजप युवा मोर्चा आणि महिला मोर्चा यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत प्रथम बुकिंग करणाऱ्या २१ भाविकांना अत्यंत भक्तिभावाने या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचे वाटप केले जाणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही निसर्गाचे रक्षण करत गणेशोत्सव भक्तिभावाने साजरा व्हावा, यासाठी ही चळवळ हाती घेण्यात आली आहे. परिसरातील भाविकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन लवकरात लवकर आपली मूर्ती बुकिंग करावी आणि पर्यावरण संवर्धनाच्या या चळवळीचा भाग व्हावे, असे आवाहन समाजसेवक अंकुश आपटे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



### उबाठाच्या उरणच्या नियुक्या जाहीर

**उरण :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने तसेच शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर मार्गदर्शनानुसार जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर यांनी उरण शहर संघटकपदी विजय दिलीप जाधव, उपशहरप्रमुखपदी फते खान सोंडे व युवतीसेना उरण तालुका संघटिकापदी नेहा रुपेश भगत यांच्या नियुक्या जाहीर केले आहेत. शिवसेना उरण शहर शहराच्या वतीने आयोजित जाहीर कार्यक्रमांमध्ये ज्येष्ठ शिवसेना नेते आमदार भास्करराव जाधव यांच्या शुभहस्ते हे नियुक्त पत्र देऊन या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे, तसेच जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर यांनी नियुक्ती पत्रात संघटना बांधणीसाठी व पक्ष वाढवण्यासाठी जोमाने कामाला लागा अशा शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी महिला जिल्हा संघटिका सुवर्णा जोशी, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, तालुका संपर्कप्रमुख दीपक भोईर, शहर प्रमुख विनोद म्हात्रे, शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे,शिवसेना ग्राहक कक्ष प्रमुख उरण शहर संदीप जाधव, उपजिल्हा संघटिका ममता पाटील, तालुका संघटिका भावना म्हात्रे, पदाधिकारी, महिला आघाडी व कार्यकर्ते उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्वच स्तरातून स्वागत करण्यात येत असून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'तिसरी मुंबई' विरोधात शेतकऱ्यांचा एल्गार!

**| उरण | प्रतिनिधी |**

- १५ ऑगस्टला कोकण भवनावर धडकणार
- १२४ गावांतील शेतकऱ्यांचे उपोषण

तिसरी मुंबईच्या नावाखाली उरण, पेण व पनवेल तालुक्यातील १२४ गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी आणि गावांचे अस्तित्व धोक्यात आणले जात असल्याचा आरोप करीत एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समिती, रायगडच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी बेलापूर येथील कोकण आयुक्त कार्यालयावर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे.

सकाळी १० वाजता चिरनेर हायस्कूल येथे हुतात्म्यांना अभिवादन करून शेकडो वाहनांच्या ताफ्यासह शेतकरी बेलापूरकडे रवाना होणार आहेत. सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत उपोषण करण्यात येणार आहे.

तिसऱ्या मुंबईला एक इंचही जमीन देणार नाही! असा निर्धार व्यक्त करीत शेतकऱ्यांनी सरकारला इशारा दिला आहे. शेती, घरे, गाव, भाषा, संस्कृती आणि भूमिपुत्रांचे अस्तित्व वाचविण्यासाठी आता निर्णायक लढा उभारणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

आपलं भविष्य, आपली शेती; आपलं घर आणि गाव वाचवण्यासाठी तरुणांनीही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष सुधाकर पाटील, कार्याध्यक्ष संतोष ठाकूर व सरचिटणीस रूपेश पाटील यांनी केले आहे. शासन विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या सुपीक जमीन संपादित करून शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांचे गाजर दाखवत आहे. दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्याकरिता शासन चालढकल करत आहे. यामुळे शासनाला जागे करण्यासाठी शेतकऱ्यांनी एल्गार करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी १२४ गावातील शेतकरी लाक्षणिक उपोषण करणार आहेत.

### पनवेलमध्ये मनसेच्या कार्यालयाचा श्रीगणेशा



**| खांदा कॉलनी | वार्ताहर |**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पहिल्या कार्यालयाचे महात्मा गांधी उद्यानासमोर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तरुणाई उपस्थित होती. राज ठाकरे यांच्या उपस्थितीने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# सिडकोच्या सुरक्षा रक्षक भरतीत भूमिपुत्रांना ठेंगा!

**| उरण | प्रतिनिधी |**

नवी मुंबई प्रकल्पासाठी ९५ गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या; मात्र सिडकोच्या ५० सुरक्षा रक्षक व ४ पर्यवेक्षक अशा ५४ पदांच्या भरतीत प्रकल्पबाधित भूमिपुत्रांना डावलण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. रायगड सुरक्षा मंडळाच्या सुमारे २०० उमेदवारांच्या यादीत प्रकल्पग्रस्त गावातील एकाही भूमिपुत्राचे नाव नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

ज्यांच्या जमिनीवर प्रकल्प उभा राहिला, त्यांनाच साधी सुरक्षा रक्षकाची नोकरी मिळणार नसेल तर भूमिपुत्रांच्या रोजगार धोरणाचे काय झाले? असा संतप्त सवाल १९८४च्या आंदोलनातील जखमी प्रमोद ठाकूर यांनी केला आहे.

सिडको, जेएनपीए, नवी मुंबई विमानतळ, द्रोणागिरी नोड किंवा अन्य आस्थापनांमध्ये सुरक्षा रक्षक भरती करताना प्रथम प्रकल्पबाधित, त्यानंतर गाव, तालुका आणि जिल्ह्यातील भूमिपुत्रांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# अनधिकृत बांधकामांवर सिडकोचा बुलडोझर

## द्रोणागिरी, कामोठे ते विमानतळालगतच्या परिसरात सलग कारवाई

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबईतील सिडकोच्या मालकीच्या भूखंडांवरील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात कारवाई तीव्र करण्यात आली असून, द्रोणागिरी, कामोठे, तरघर ते उलवे प्रवेश पूल आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगतच्या परिसरात सिडकोने सलग पाडकाम मोहीम राबविली.



या कारवाईत पक्की बांधकामे, गॅरेज, ढाबा, दुकाने, स्टॉलसह रस्ते आणि पदपथांवरील सुमारे ५० टपऱ्या हटविण्यात आल्या. अनधिकृत वाहनतळांवरही कारवाई करून अवजड वाहने भूखंडाबाहेर काढण्यात आली. या कारवाईत पक्की बांधकामे, गॅरेज, ढाबा, दुकाने, स्टॉलसह रस्ते आणि पदपथांवरील सुमारे ५० टपऱ्या हटविण्यात आल्या. अनधिकृत वाहनतळांवरही कारवाई करून अवजड वाहने भूखंडाबाहेर काढण्यात आली.

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने ५ ऑगस्ट रोजी द्रोणागिरी नोडमधील सेक्टर एक, भूखंड क्रमांक ५९ येथे कारवाई केली. या ठिकाणचे सुमारे ७० चौरस मीटर क्षेत्रफळाचे पक्के वीट बांधकाम, पत्र्याच्या शेडमधील गॅरेज आणि ट्रक पार्किंग हटविण्यात आले. त्याचबरोबर सेक्टर ४७ आणि ५० मधील रस्ते व पदपथांवरील ४० ते ५० कच्च्या-पक्क्या टपऱ्यांवर जेसीबीच्या सहाय्याने कारवाई करण्यात आली. कामोठे नोडमध्येही त्याच दिवशी मोठी कारवाई करण्यात आली. सेक्टर २४ मधील भूखंड क्रमांक १६ लगतच्या जागेवर अनधिकृतपणे उभी करण्यात आलेली अवजड वाहने टोईंग करून बाहेर काढण्यात आली. या भूखंडावरील एक गॅरेज आणि टायरचे दुकान पाडण्यात आले.

सेक्टर २२ मधील भूखंड क्रमांक ३९ आणि ३९ ए वरील सहा अनधिकृत स्टॉल हटविण्यात आले. सेक्टर ३१ मध्ये सुमारे ५०० चौरस मीटर जागेत उभारण्यात आलेल्या अनधिकृत ढाब्यावरही सिडकोने बुलडोझर चालविला. यापूर्वी १ आणि २ ऑगस्ट रोजी तरघर ते उलवे प्रवेश पूल तसेच तरघर रेल्वे स्थानकाजवळील आम्र मार्ग परिसरात अतिक्रमणविरोधी मोहीम राबविण्यात आली होती. या भागातील अतिक्रमणे सर्व्हिस रोड आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत असल्याने ती हटविण्यात आल्याचे सिडकोने स्पष्ट केले.

सिडकोची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता तसेच प्रचलित नियम आणि धोरणांचे उल्लंघन करून ही बांधकामे उभारण्यात आली होती. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.सिडको मंडळाचे दक्षता विभागाचे प्रमुख सूरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली या विभागाचे काम सुरू आहे. आतापर्यंत अतिक्रमण विभागाने ११ हजार कोटी रूपयांची जागा मोकळी करून सिडकोच्या ताब्यात घेतली आहे. मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई नवी मुंबई व पनवेल उरण येथे जोरदार सुरू आहे. सिडकोचा अधिकारी आणि कर्मचारी, स्थानिक पोलीस पथक, महावितरण कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान सहभागी झाले होते. कारवाईसाठी जेसीबी, ट्रक, गॅस कटर आणि मनुष्यबळाचा वापर करण्यात आला.

# भातपिकाला वाचविण्यासाठी शेतकरी शेतात व्यस्त

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

भात लागवडीची कामे जवळपास पूर्ण झाल्यानंतर आता भातशेतीमध्ये उगवलेल्या विविध प्रकारच्या तणांवर नियंत्रण मिळविण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू झाली आहे.



भातपिकासोबत शेतामध्ये गवत व विविध प्रकारचे तण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने त्याचा थेट परिणाम भात पिकाच्या वाढीवर होण्याची शक्यता असते. त्यामुळे वेळेत तण काढून शेत स्वच्छ ठेवण्यावर शेतकऱ्यांनी भर दिला आहे. भात पिकाला वाढीसाठी आवश्यक असलेले पाणी, अन्नद्रव्ये आणि सूर्यप्रकाश तणांमुळे मोठ्या प्रमाणात वापरला जातो. परिणामी भाताच्या रोपांची अपेक्षित वाढ होत नाही आणि पुढे उत्पादनावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे भात लागवडीनंतरच्या काळात तण नियंत्रणाला विशेष महत्त्व प्राप्त होते. सध्या ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी शेतकरी तसेच शेतमजूर भाताच्या शेतामध्ये तण काढण्याच्या कामात व्यस्त असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सकाळपासूनच शेतांमध्ये तण काढण्याची कामे सुरू असून, हाताने तण काढण्याबरोबरच आवश्यकतेनुसार विविध पद्धतींचा वापर केला जात आहे. पावसाळ्यातील दमट वातावरण आणि शेतातील ओलाव्यामुळे तणांची वाढ वेगाने होत असल्याने शेतकऱ्यांना वारंवार तण काढावे लागत आहे. भात पिकाची निरोगी वाढ होऊन चांगले उत्पादन मिळावे, यासाठी शेतकरी मेहनत घेत आहेत. भाताचे भरघोस उत्पादन मिळावे अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

> भात लागवडीनंतर शेतात तण मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे वेळेत तण काढणे गरजेचे आहे. तणामुळे भात पिकाची वाढ कमी होऊ शकते आणि उत्पादनावरही परिणाम होतो. यासाठी आम्ही शेतमजूरांच्या मदतीने तण काढण्याचे काम करीत असतो.
>
> -मच्छिंद्र पारठे, शेतकरी वणवे (खालापूर)

# शिवथरघळ येथे कोमसाप म्हसळा शाखेची वर्षा सहल




**| म्हसळा | प्रतिनिधी |**

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या ऐतिहासिक व आध्यात्मिक शिवथरघळ येथे कोकण मराठी साहित्य परिषद,शाखा म्हसळा यांच्या वतीने वर्षा सहलीचे आयोजन करण्यात आले.

या सहलीमध्ये शाखेच्या २० सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सह्याद्रीच्या निसर्गरम्य वातावरणात वसलेल्या शिवथरघळीची सदस्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. शिवथरघळीचा ऐतिहासिक वारसा, समर्थ रामदास स्वामींचे वास्तव्य, सुंदरमठ म्हणून असलेले महत्त्व तसेच दासबोधाच्या निर्मितीशी जोडलेला साहित्यिक संदर्भ याबाबत सदस्यांनी माहिती जाणून घेतली.पावसाळ्यात हिरवाईने नटलेल्या सह्याद्रीच्या पर्वतरांगा, डोंगर-दऱ्या,वाहणारे झरे आणि शिवथरघळीचे निसर्गरम्य वातावरण याचा साहित्यप्रेमींनी मनमुराद आनंद घेतला.

ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्व असलेल्या या स्थळाची पाहणी करताना सदस्यांनी विविध माहितीचे संकलन करून आपल्या साहित्यिक दृष्टिकोनातून या परिसराचा अनुभव घेतला.साहित्य परिषद ही केवळ साहित्यिक कार्यक्रमांपुरती मर्यादित न राहता इतिहास, संस्कृती, निसर्ग आणि पर्यटनस्थळांचा अभ्यास करून त्यातून साहित्यिक दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहे अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. वर्षा सहलीच्या माध्यमातून साहित्यप्रेमी सदस्यांना एकत्र येत अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली.

इतिहास आणि निसर्ग यांचा सुंदर संगम घडवून आणणारी ही वर्षा सहल सदस्यांच्या कायम स्मरणात राहील असा सूर सहभागी साहित्यप्रेमींमधून अध्यक्ष रायप्पा माशाळे, केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, उपाध्यक्षा अपर्णा ओक, कोमसाप सचिव कीर्तीमाला विचारे, कोषाध्यक्ष सुनील उमरोटकर, साहित्यिक डॉ. सुभाष ओक, रमेश पोटले, सदस्या प्रा.सुरेखा खेडेकर, नगरसेविका जयश्री कापरे, मीनल ढवळे, महेंद्र ढवळे, प्रा.वैशाली माशाळे, प्रणिता गावित, अतिक्षा काते, साधना सुभाष कव्हर, स्नेहा उमरोटकर, विभा खांबेटे, अंकिता काते यांनी व्यक्त केला.

**पावसाळी पर्यटनाला बहर** | धबधबा, धुक्याची दुलई अन् हिरवाई अनुभवण्यासाठी पर्यटकांची गर्दी

# खोपोली-झनिथचा धबधबा पर्यटकांना खुणावतोय

**| खोपोली | प्रतिनिधी |**

पावसाच्या सरींनी सह्याद्रीचे रूपडे पालटले असून, डोंगरकड्यांवरून कोसळणाऱ्या जलधारा आणि हिरवाईने नटलेला परिसर पर्यटकांना आकर्षित करू लागला आहे. खोपोली परिसरातील प्रसिद्ध झनिथ धबधबा सध्या पर्यटकांना खुणावत असून, पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी मुंबई, पुणे तसेच रायगड जिल्ह्यातील पर्यटकांची पावले झनिथकडे वळू लागली आहेत.



पावसामुळे झनिथ धबधब्याला नवसंजीवनी मिळाली असून, डोंगरकड्यावरून वेगाने खाली झेपावणाऱ्या शुभ्रधवल जलधारा, उडणारे तुषार आणि सभोवतालची हिरवीगार वनराई यामुळे परिसराचे सौंदर्य खुलले आहे. त्यातच डोंगररांगांवर पसरलेली धुक्याची दुलई या निसर्गरम्य वातावरणात आणखी भर घालत आहे.

सकाळच्या वेळी धुक्यात हरवलेल्या डोंगररांगा, खळखळत वाहणारे पाणी आणि पक्ष्यांचा किलबिलाट यामुळे झनिथ परिसर एखाद्या निसर्गचित्राप्रमाणे भासत आहे. शहरातील धावपळीपासून काही काळ दूर जाऊन निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवण्यासाठी पर्यटक या परिसराला पसंती देत आहेत. झनिथकडे वाढणाऱ्या पर्यटकांच्या संख्येमुळे स्थानिक नागरिकांनाही व्यवसायाच्या संधी उपलब्ध होत आहेत. पर्यटकांसाठी चहा, नाश्ता, खाद्यपदार्थ, पावसाळी साहित्य तसेच विविध स्थानिक वस्तूंच्या विक्रीला चालना मिळत आहे. त्यामुळे झनिथचे पावसाळी पर्यटन केवळ निसर्गाचा आनंद देणारे ठरत नसून, स्थानिक अर्थव्यवस्थेलाही हातभार लावत आहे.

### निसर्गसौंदर्य कॅमेऱ्यात कैद करण्याची धडपड

धबधब्याचे मनोहारी रूप आणि हिरवाईने नटलेला परिसर पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे. मोबाईलमध्ये धबधब्याचे फोटो आणि व्हिडीओ टिपण्याबरोबरच सेल्फी काढण्यासाठीही उत्साह दिसून येत आहे.

### सुरक्षिततेचीही गरज

पावसाळ्यात धबधब्याच्या परिसरात पाण्याचा प्रवाह वाढत असल्याने पर्यटकांनी सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे. ओल्या दगडांवरून घसरण्याचा धोका असल्याने धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, अशा सूचना देण्याची गरज आहे. प्रशासनानेही पर्यटनस्थळी आवश्यक सुरक्षा उपाययोजना, सूचना फलक आणि आपत्कालीन व्यवस्थेकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे. पावसाच्या प्रत्येक सरीसोबत झनिथचे रूप अधिकच खुलत असून, धबधब्याच्या फेसाळत्या धारा, धुक्याची दुलई आणि सह्याद्रीची हिरवाई अनुभवण्यासाठी पर्यटकांना झनिथची ओढ लागली आहे. निसर्गसौंदर्यासोबतच स्थानिकांच्या हाताला रोजगाराची संधी देणारे झनिथचे पावसाळी पर्यटन यंदा विशेष आकर्षण ठरत आहे.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| RGD/016/2026-2028



### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० ऑगस्ट
१) श्री. रमाकांत रघुनाथ वाबळे अलिबाग, १०-८-१९४२
२) श्रीम. वंदना विश्वनाथ म्हात्रे सारळ, अलिबाग १०-८-१९४२
३) श्री. गणपत सदाशिव नाटेकर गोंधळपाडा, अलिबाग १०-८-१९२९
४) श्रीम. प्रतिभा परशुराम सुतार अलिबाग, १०-८-१९५१
५) श्रीम. वैशाली प्रभाकर इंदुलकर अलिबाग, १०-८-१९५०
६) श्री. गजानन अंबाजी पाटील अलिबाग, १०-८-१९५७
७) श्री. काशिनाथ मधुसूदन क्रमवंत अलिबाग, १०-८-१९५५

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**श्रीमती द्रौपदी धर्मा कदम स्मरणार्थ, अलिबाग**

## ‘पंतप्रधान मोदींची लवकरच भेट घेणार’

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोकसभेतील सर्व आठही खासदार आम्ही महाराष्ट्राच्या प्रश्नांसाठी आणि विकासकामांसाठी रीतसर वेळ मागून देशाच्या पंतप्रधानांची भेट घेणार आहोत. ते केवळ एका पक्षाचे पंतप्रधान नाहीत, तर संपूर्ण देशाचे पंतप्रधान आहेत.त्यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीचे फोटोही आम्ही तुम्हाला नक्की देऊ, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी मुंबई येथे पत्रकारांची संवाद साधताना म्हटले आहे.

## ‘पदभरती, पदोन्नतीला तात्काळ गती देणार’

**मुंबई** : राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ तातडीने उपलब्ध करून देण्याबरोबरच प्रलंबित पदभरती आणि पदोन्नतीच्या प्रक्रियांना गती देण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

# बायपासचे काम युद्धपातळीवर सुरू

## ● गणेशोत्सवापूर्वी एक लेन सुरू होणार? ●पूर्ण मार्ग १५ सप्टेंबरनंतर खुला होण्याची शक्यता

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या लाखो चाकरमान्यांना यंदा काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. माणगावइंदापूर बायपासची किमान एक मार्गिका गणेशोत्सवापूर्वी वाहतुकीसाठी खुली करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू असून, कळमजे नदीजवळील गार्डरचे काम पूर्ण झाल्यानंतर २१ दिवसांचा आवश्यक कालावधी पूर्ण करून १५ सप्टेंबरनंतर कळमजे ते पुढील बायपास मार्ग खुला होऊ शकतो, अशी माहिती खासदार सुनील तटकरे यांनी दिली.



माणगाव शासकीय विश्रामगृहात शनिवार, ८ ऑगस्ट रोजी खासदार सुनील तटकरे आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत मुंबई-गोवा महामार्गाच्या प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी, अपघातप्रवण ठिकाणे, पर्यायी मार्ग आणि रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. माणगाव-निजामपूर पुलापासून बायपासची एक मार्गिका सुरू करण्याचे नियोजन असून, ती सुरू झाल्यास गणेशोत्सव काळात माणगाव शहरातील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. मुगवली बायपासवरील वाहतूक नियोजन आणि बेरीकेडिंग योग्य पद्धतीने करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच साईराम हॉटेल, निजामपूर रोड ते मुगवली फाटा हा पर्यायी मार्ग गणेशोत्सवात वापरण्याबाबतही चर्चा झाली.

दरम्यान, ताम्हिणी घाटातील वाहतुकीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी सुमारे १० किलोमीटर लांबीच्या बोगद्याचा प्रस्ताव केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मांडण्यात आला असून, त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे सांगण्यात आले. सुकेळी टोलनाका सध्या सुरू होणार नसल्याचे स्पष्ट करताना, खारपाडा-इंदापूर मार्गाचे काम पूर्ण क्षमतेने झालेले नसताना टोल आकारण्यासही विरोध करण्यात आला.

### पेव्हर ब्लॉकवरुन नाराजी व्यक्त

नागोठणे, सुकेळी, कोलाड आणि माणगाव परिसरातील महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी वापरण्यात येणारे पेव्हर ब्लॉक काही दिवसांतच उखडून रस्ता पुन्हा खराब होत असल्याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी नाराजी व्यक्त केली. महामार्गावर पेव्हर ब्लॉकचा वापर तातडीने थांबवून आधुनिक तंत्रज्ञान आणि टिकाऊ साहित्याचा वापर करून खड्डे बुजवावेत, अशा स्पष्ट सूचना त्यांनी प्रशासन व संबंधित कंत्राटदारांना दिल्या.

> “माणगाव-निजामपूर पुलापासून बायपासची एक मार्गिका सुरू करण्याचे नियोजन असून, ती सुरू झाल्यास गणेशोत्सव काळात माणगाव शहरातील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. मुगवली बायपासवरील वाहतूक नियोजन आणि बेरीकेडिंग योग्य पद्धतीने करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.
> - खा. सुनील तटकरे”

महामार्गावरील सर्व्हिस रोडचा अभाव, अपघातप्रवण ठिकाणे, खड्डे आणि वाहतूक सुरक्षेबाबतही बैठकीत चर्चा झाली. गणेशोत्सवाच्या काळात मोर्बा रोडसह उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. महामार्गाच्या कडेला वाहने उभी करू नयेत, असे आवाहन खासदार सुनील तटकरे यांनी नागरिक व व्यापाऱ्यांना केले.



## विद्यालयात वृक्षलागवड

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

वाढदिवस साजरा करण्याच्या पारंपरिक पद्धतीला फाटा देत वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाचे निवृत्त अधिकारी सिताराम चंद्राबाई गंगाराम खाडे यांच्या ७७ व्या वाढदिवसानिमित्त निजामपूर येथील जी.आर. मेथा माध्यमिक विद्यालयात तब्बल २१० फळझाडे व विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.

खाडे यांच्या पर्यावरण संवर्धनातील उल्लेखनीय सेवेला अभिवादन म्हणून संतोष खाडे यांनी विद्यालयाला २१० झाडे भेट दिली. या उपक्रमामुळे वाढदिवसाचा आनंद सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाशी जोडला गेला. विद्यालयाच्या परिसरात करंज, तुती, जांभूळ, काजू, आवळा, चिंच, साग, सीताफळ आदी विविध प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली.

## ‘तवसाळकर लॉजसमोरील मोरीचे काम करा’

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड येथील तवसाळकर लॉजसमोरील मोरीचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे, अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाने दिला आहे. याबाबत मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांच्या वतीने कनिष्ठ लिपिक दर्शन मिठाग्री यांच्याकडे निवेदन सादर केले. यावेळी उपाध्यक्ष देवेन सतविडकर उपस्थित होते.

मुरूड हे पर्यटनस्थळ असल्याने मुरूड समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या संख्येने पर्यटक येतात. तसेच समुद्रकिनाऱ्यावरून जंजिरा किल्ल्याकडे जाणारा हा प्रमुख मार्ग आहे. मात्र, गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून मोरीचे काम रखडल्याने या मार्गावरील वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे वाहनचालक, व्यावसायिक आणि नागरिकांमध्ये वादाचे प्रसंगही घडत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



■ (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

येत्या काळात सार्वजनिक गोविंदा, गौरी-गणपती व नवरात्रोत्सव असल्याने या मार्गावर मोठी गर्दी होणार आहे. मोरीचे काम अपूर्ण राहिल्यास अपघात होऊन जीवितहानी अथवा दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असा इशाराही मंडळाने दिला आहे. १५ ऑगस्ट २०२६ पूर्वी मोरीचे काम पूर्ण न झाल्यास मंडळाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांमध्ये ‘अंमली पदार्थमुक्त भारत’बाबत जनजागृती

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय फुंडे येथे ‘अंमली पदार्थमुक्त भारत’ या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे सेवन व व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम तसेच त्याचा व्यक्ती, कुटुंब आणि समाजावर होणारा परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. युवकांनी व्यसनापासून दूर राहून निरोगी आणि व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले.



कार्यक्रमास सुमित केंद्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी मार्गदर्शन करून व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी युवकांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी, प्राचार्य डॉ. अमोद ठक्कर होते. कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार प्रदर्शन डॉ. रत्नमाला जावळे यांनी केले. यावेळी पोलीस अधिकारी, हवालदार घनश्याम पाटील तसेच डॉ. राहुल पाटील, डॉ. वाधवा आणि डॉ. धरती घरत, प्रा श्रीकांत गोटपागर उपस्थित होते. महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

## दिल्लीत मराठी चित्रपट महोत्सव

**नवी दिल्ली** : मराठी चित्रपटसृष्टीला राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देणाऱ्या ‘दिल्ली मराठी चित्रपट महोत्सव’ चे उद्घाटन खा. विनोद तावडे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमात महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संयुक्त विद्यमाने नवी दिल्लीत कार्यान्वित करण्यात येणाऱ्या दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळाचेही उद्घाटन करण्यात मान्यवरांच्या हस्ते झाले.

# अवैध खैराच्या लाकडाची वाहतूक उधळली

## ● श्रीवर्धन पोलिसांची धडक कारवाई ●चालक वनविभागाच्या ताब्यात

**। राजापूर । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन, प्रतिनिधी

श्रीवर्धन पोलिसांनी अवैध खैराच्या लाकडाची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करत गाडी जप्त केली असून चालकाला ताब्यात घेतले आहे. बागमंडला जेट्टी परिसरात ही कारवाई करण्यात आली.

शुक्रवारी (दि. ७) अवैधरित्या खैराचे लाकूड वाहून नेले जात असल्याची माहिती



श्रीवर्धन पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने बागमंडला जेट्टी येथे एमएच ०८ एपी ३३९१ क्रमांकाची संशयित गाडी अडवून तपासणी केली. यावेळी वाहनामध्ये तांबड्या रंगाचे लाकूड आढळून आले. चौकशीत चालक प्रकाश यशवंत चांदे (रा. कांदिवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी) याने हे लाकूड खैराचे असल्याचे सांगितले. यानंतर पोलिसांनी जप्त वाहन व चालकाला पुढील कायदेशीर कारवाईसाठी श्रीवर्धन वनविभागाच्या ताब्यात दिले.

ही कारवाई रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे आणि पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार कायपाक, पोलीस शिपाई ठोंबरे व शिंदे यांच्या पथकाने केली.

**खरीप पीक स्पर्धेतून शेतकऱ्यांना संधी** | **३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन**

# भात-नाचणी उत्पादकांसाठी सुवर्णसंधी!

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील भात आणि नाचणी उत्पादक शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. खरीप हंगाम २०२६ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या पीक स्पर्धेसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, शेतकऱ्यांनी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना तालुका, जिल्हा तसेच राज्यस्तरावर गौरविण्याची संधी या स्पर्धेतून मिळणार आहे.

शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पीक उत्पादकता वाढवावी, प्रगतिशील शेतकऱ्यांच्या प्रयोगांचा इतरांना



लाभ मिळावा आणि उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव व्हावा, या उद्देशाने कृषी विभागामार्फत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे ही स्पर्धा केवळ पारितोषिकाची संधी नसून शेतकऱ्यांच्या शेतीतील कौशल्य, नियोजन आणि प्रयोगशीलता सिद्ध करण्याचे व्यासपीठ ठरणार आहे.

कर्जत तालुका भात उत्पादनासाठी महत्त्वाचा असून, येथील शेतकरी आधुनिक पद्धतींचा वापर करून भात उत्पादन घेत आहेत. त्याचबरोबर नाचणी हेही कोकणातील महत्त्वाचे पीक आहे. त्यामुळे या दोन्ही पिकांच्या उत्पादकांनी मोठ्या संख्येने स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या संकेतस्थळावरील ‘पीक स्पर्धा नोंदणी’ सुविधेद्वारे ऑनलाइन अर्ज करावा. कर्जत तालुक्यातील पात्र भात व नाचणी उत्पादकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या उत्कृष्ट उत्पादनाची ओळख जिल्हा आणि राज्यस्तरावर निर्माण करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### भातासाठी २०, नाचणीसाठी ४० गुंठे क्षेत्र

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्याने संबंधित पीक स्वतःच्या नावावर असलेल्या जमिनीवर स्वतः लागवड केलेले असणे आवश्यक आहे. भात पिकासाठी किमान २० गुंठे, तर नाचणीसाठी किमान ४० गुंठे सलग लागवड क्षेत्र असणे आवश्यक आहे. सुधारित वाणांचा वापर, योग्य खत व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण, पाणी व्यवस्थापन, तण नियंत्रण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही विशेष संधी आहे.

### राज्यस्तराव गौरव

पीक स्पर्धेत सहभागी झाल्याने उत्कृष्ट उत्पादनाची नोंद होण्याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळणार आहे. उत्कृष्ट शेतकऱ्यांच्या शेतीतील प्रयोगांचा इतर शेतकऱ्यांना फायदा होईल. तसेच तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर गौरव व रोख पारितोषिक मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

# निवडक



## ‘दामिनी’ची वार्षिक सभा उत्साहात

**श्रीवर्धन** : उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तालुका अभियान व्यवस्थापक कक्ष, पंचायत समिती श्रीवर्धन अंतर्गत मदामिनी महिला प्रभाग संघ, बागमांडलाफ यांच्या वतीने शनिवारी (दि. ०८) ऑगस्ट रोजी कुणबी समाज हॉल येथे वार्षिक सर्वसाधारण सभा व स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दामिनी पथक श्रीवर्धन पोलीस ठाणे यांच्या सौजन्याने स्लाईड शो माध्यमातून महिला आणि बालकांची सुरक्षा ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. जेव्हा महिला आणि मुले सुरक्षित असतील, तेव्हाच सुरक्षित समाज आणि सशक्त राष्ट्राची निर्मिती होईल. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत महिला आणि बालकांनी न घाबरता पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले. यावेळी पूजा शिंदे, अस्मिता चोरगे, वैभवी कोमनाक, राजू किरवे, स्वप्नील जाधव, भरत कुबेर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन दामिनी महिला प्रभाग संघ, बागमांडला अध्यक्ष शालिनी चाफे, भाविका काप, किशोर गोरटे यांनी केले.




## लायन्स क्लबतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**कोलाड** : रोहा तालुक्यातील धानकान्हे आदिवासी वाडीतील गरजू विद्यार्थिनी स्नेहल सचिन जाधव, इयत्ता १२ वी कॉमर्समध्ये शिक्षण घेत असून, तिच्या शैक्षणिक वाटचालीला हातभार लागावा या उद्देशाने लायन्स क्लब कोलाडच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. लायन चेतन अग्रवाल यांच्या विशेष सहकार्यातून तसेच लायन्स क्लब कोलाडच्या पुढाकाराने गुरुवारी (दि.६) पदाधिकाऱ्यांनी धानकान्हे येथील विद्यार्थिनीच्या निवासस्थानी जाऊन तिला आवश्यक शैक्षणिक साहित्य प्रदान केले. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा लायन्स क्लबचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून, सामाजिक बांधिलकी जपण्याचे हे एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. यावेळी कोलाड लायन्स क्लबचे अध्यक्ष श्याम लोखंडे, माजी अध्यक्ष रवींद्र लोखंडे, खजिनदार दिनकर सानप, नंदकुमार कळमकर, दिलीप मोहिते सदस्य आदी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन

**म्हसळा** : कोकण उन्नती मित्र मंडळ, मुंबई संचलित वसंतराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा येथे पदवी काळात स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कोकण उन्नती मित्र मंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले व महाविद्यालय विकास समिती यांच्या मार्गदर्शनाखाली, वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट, रोहा आणि युनिक अकॅडमी, पुणे संचलित सुनिल तटकरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी, रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. दिगंबर टेकळे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून युनिक अकॅडमीचे मुख्य व्यवस्थापक प्रा. नागेश गव्हाणे उपस्थित होते. कार्यशाळेच्या निमित्ताने युनिक अकॅडमीच्या प्रकाशन विभागातर्फे स्पर्धा परीक्षा विषयक पुस्तक प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात विविध पुस्तके विद्यार्थ्यांना विशेष सवलतीत उपलब्ध करून देण्यात आली होती. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. मयुर बढे, प्रा. सलमा नजिरी, अतिका नजिरी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## उपशिक्षणाधिकाऱ्यांची शाळेला भेट

**पाली** : सुधागड तालुक्यातील राबगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला नुकतीच उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे यांनी सदिच्छा भेट दिली. शाळेतील शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने ही भेट आयोजित करण्यात आली होती. भेटीदरम्यान उपशिक्षणाधिकारी शेडगे यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन आणि गणितीय कौशल्यांचे मूल्यमापन केले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी शेडगे यांनी वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारले. शिक्षकांच्या अध्यापन पद्धतीची पाहणी केली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक वृंद उपस्थित होते. त्यांनी शाळेत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपशिक्षणाधिकाऱ्यांना दिली. शेडगे यांनी शिक्षकांना दर्जेदार शिक्षणासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

## सर्पमित्राकडून मुंगुसाची सुटका

**खांदा कॉलनी** : नवी मुंबई परिसरात एका चारचाकी वाहनात मुंगूस शिरल्याने काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. वाहनमालकाने ही बाब लक्षात येताच पुनर्वसु फाऊंडेशनशी संपर्क साधला. माहिती मिळताच सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. वाहनाची बारकाईने पाहणी केली असता मुंगूस गाडीच्या पुढील चाकाजवळ लपून बसल्याचे आढळले. कोणताही धोका निर्माण होणार नाही, याची खबरदारी घेत अष्टविनायक मोरे यांनी अत्यंत कौशल्याने मुंगुसाला सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यानंतर मुंगुसाची तपासणी करण्यात आली. त्याला कोणतीही दुखापत झाली नसल्याची खात्री झाल्यानंतर त्याला नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले. या यशस्वी बचावकार्याबद्दल वाहनमालक व नागरिकांनी पुनर्वसु फाऊंडेशन तसेच सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांचे आभार मानले.

# देशाच्या अखंडतेसाठी सर्वोच्च बलिदान; जनरल अरुणकुमार वैद्य

**ऑगस्ट महिना देशाच्या स्वातंत्र्याचा अभिमान जागवणारा; पण याच महिन्यात देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या एका शूर सुपुत्राच्या स्मृतीही जाग्या होतात. भारताचे माजी लष्करप्रमुख, अलिबागचे सुपुत्र जनरल अरुणकुमार वैद्य यांची १० ऑगस्ट १९८६ रोजी अतिरेक्यांनी पुण्यात गोळ्या झाडून हत्या केली. देशाच्या अखंडतेसाठी आयुष्य झोकून देणाऱ्या या शूर सेनानीचा आज ४० वा स्मृतिदिन. विशेष म्हणजे, २०२६ हे जनरल वैद्य यांचे जन्मशताब्दी वर्ष असून, अलिबागमध्ये विविध उपक्रमांतून त्यांचे स्मरण केले जात आहे.**

बळवंत वालेकर

वैद्य कुटुंब मूळचे अलिबागचे. त्यांचे वडील श्रीधरपंत वैद्य (आय.सी.एस.) यांनी अलिबागचे जिल्हाधिकारी म्हणूनही काम पाहिले. अरुणकुमार यांचे प्राथमिक शिक्षण अलिबाग येथे झाले. पुढे वडिलांच्या सततच्या बदल्यांमुळे त्यांचे शिक्षण मुंबई, पुणे आणि अन्य ठिकाणी झाले. प्रखर बुद्धिमत्ता आणि अचूक निर्णयक्षमता असलेल्या अरुणकुमार यांनी सनदी अधिकारी व्हावे, अशी त्यांच्या आई-वडिलांची इच्छा होती. मात्र, त्यांनी सुखाची वाट न निवडता रणरणते ऊन, कडाक्याची थंडी, बर्फाच्छादित प्रदेश आणि मुसळधार पावसाचा सामना करणाऱ्या लष्करी जीवनाची वाट निवडली.

शिस्त, धैर्य, चिकाटी, तडफ, विश्वासार्हता आणि निर्णयक्षमतेच्या जोरावर त्यांनी लष्करात वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या पराक्रमासाठी महावीरचक्र, अतिविशिष्ट सेवा पदक आणि दुसरे महावीरचक्र अशा सन्मानांनी त्यांना गौरविण्यात आले. अखेर १ ऑगस्ट १९८३ रोजी भारताच्या भूसेनाप्रमुखपदी त्यांची नियुक्ती झाली. हा केवळ वैद्य कुटुंबाचा नव्हे, तर रायगड आणि महाराष्ट्राचा सन्मान ठरला.

लष्करप्रमुखपदाची जबाबदारी सांभाळत असतानाही वैद्य साहेबांना अलिबाग आणि त्यांनी शिक्षण घेतलेल्या इंडस्ट्रीयल हायस्कूलची ओढ होती. २८ सप्टेंबर १९८५ रोजी त्यांनी लष्करी लवाजम्यासह शाळेला सदिच्छा भेट दिली. यावेळी को.ए.सो.चे कार्याध्यक्ष ॲड. दत्ता पाटील यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती दिली. जुन्या आठवणींनी वैद्य साहेब भावूक झाले. बागुल सर आणि राणे सरांनी शिस्त, वेळेचे महत्त्व आणि व्यायामाचे संस्कार दिल्यामुळे आपण सेनाप्रमुखपदापर्यंत पोहोचलो, अशी कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली. शाळेच्या सत्काराचा स्वीकार करत त्यांनी कृतज्ञतापूर्वक चांदीच्या ढालीची प्रतिकृती आणि १० हजार रुपयांचा धनादेश शाळेला दिला.

पंजाबमध्ये फुटीरतावादी चळवळीला आळा घालण्यासाठी सुवर्ण मंदिरात ऑपरेशन ब्ल्यू स्टार करण्यात आले. या कारवाईची जबाबदारी लष्करप्रमुख जनरल अरुणकुमार वैद्य यांच्यावर होती. कारवाई यशस्वी झाली; मात्र त्यानंतर वैद्य साहेब अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर आले. त्यांना सातत्याने धमकीचे फोन येत होते. लष्करप्रमुख असताना सरकारी सुरक्षा होती. मात्र, निवृत्तीनंतर ही सुरक्षा काढून घेण्यात आली. याच पार्श्वभूमीवर १० ऑगस्ट १९८६ रोजी पुण्यात अतिरेक्यांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. या घटनेने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला आणि अलिबागवरही दुःखाची छाया पसरली.

जनरल वैद्य यांच्या हौतात्म्यानंतर त्यांच्या शौर्याचा आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर कायम राहावा, यासाठी इंडस्ट्रीयल हायस्कूलला त्यांचे नाव देण्याची कल्पना पुढे आली. त्यावेळी मी ही सूचना ॲड. दत्ता पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष तथा को.ए.सो. संचालक प्रभाकर पाटील, प्रशासन अधिकारी दि.रा. फुलगावकर आणि रायगड बाजारचे जनरल मॅनेजर प्रताप सरनाईक यांच्यासमोर मांडली. या प्रस्तावाला सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. शाळा समितीचा ठराव संस्थेकडे पाठविण्यात आला. संस्थेने शिफारस करून जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आणि एस.एस.सी. बोर्डाकडे प्रस्ताव पाठविला. मान्यता मिळाल्यानंतर इंडस्ट्रीयल हायस्कूलचे नामकरण 'भारताचे माजी लष्करप्रमुख जनरल अरुणकुमार वैद्य माध्यमिक विद्यालय, अलिबाग' असे करण्यात आले. जनरल वैद्य यांचे स्मरण पुढील पिढ्यांना व्हावे, यासाठी त्यांचे तैलचित्र लावण्याचा पाठपुरावा मी केला. त्यानंतर पोलीस अधीक्षक श्री. घारगे यांच्या पुढाकाराने त्यांच्या कार्यालयासमोरील भिंतीवर तैलचित्र लावण्यात आले आणि ऑगस्ट २०२५ मध्ये त्याचे अनावरण करण्यात आले.



२०२६ हे जनरल अरुणकुमार वैद्य यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्त 'अरुणकुमार वैद्य जन्मशताब्दी महोत्सव समिती' स्थापन करण्यात आली आहे. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाखालील या समितीत उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, ॲड. रघूजीराजे आंग्रे, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील आणि माझा समावेश आहे.

जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून १० ऑगस्ट रोजी अलिबाग येथील शिशुविहार प्राथमिक शाळेत रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जनरल वैद्य यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात येणार आहे. देशाच्या अखंडतेसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या अलिबागच्या या शूर सुपुत्राला मानाचा मुजरा!

## निवडक



### 'फलाटांचे धोकादायक अंतर कमी करा'

**नेरळ** : मध्य रेल्वेच्या भिवपुरी रोड रेल्वे स्थानकातील लोकल आणि फलाटांमधील धोकादायक अंतरामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दोन्ही फलाटांवर लोकल आणि फलाटामध्ये सुमारे दीड फूट अंतर असल्याने विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, लहान मुले तसेच गुडघेदुखीचा त्रास असलेल्या प्रवाशांना गाडीत चढताना-उतरताना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे हे अंतर तातडीने कमी करण्याची मागणी भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेने केली आहे. फलाट आणि लोकलमधील पोकळीमुळे प्रवाशांचा तोल जाऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने फलाटांची उंची वाढवून लोकल व फलाटातील अंतर सुरक्षित पातळीवर आणावे, अशी मागणी प्रवासी संघटनेने केली आहे. दरम्यान, भिवपुरी रोड स्थानकाच्या दोन्ही फलाटांवर अद्याप पूर्ण प्रवासी निवारा शेड नसल्याने प्रवाशांना उन्हात आणि पावसात उभे राहावे लागते. त्यामुळे दोन्ही फलाटांवर पूर्ण लांबीचे निवारा शेड उभारण्यात यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. तसेच मुंबईकडील बाजूस प्रवाशांसाठी स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नसल्याने त्या ठिकाणी तातडीने स्वच्छतागृह बांधावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.



### नेरळ जंक्शन स्थानकातील सरकता जिन्याचे काम अंतिम टप्प्यात

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील महत्त्वाच्या असलेल्या नेरळ जंक्शन रेल्वे मेकओव्हर सुरु आहे. यात फलाट दोनवरील विकासकामांनी वेग घेतला असून, फलाट दोनवर आता सरकता जिना तयार होत आहे. याबाबत नेरळ स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून मावळ लोकसभा मतदारसंघाचे खा. श्रीरंग बारणे यांचे आभार मानले जात आहेत. मध्य रेल्व वरील जंक्शन रेल्वे स्थानक असलेल्या नेरळ रेल्वे स्थानकात खा. श्रीरंग बारणे यांच्याकडून गेली पाच वर्षे अनेक विकासकामे सुरु आहेत. स्थानकात उतरल्यावर बाहेर जाण्यासाठी स्काय वॉक तसेच फलाट एक वर दोन ठिकाणी सरकते जिने उभारले गेले आहेत. निवारा शेड तसेच पादचारी पुलांची उभारणी पूर्ण झाली आहे. फलाट दोनवर सरकता जिना उभारला जात असून, त्या सरकत जिन्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. हा सरकता जिना जुन्या पेपर स्टॉलजवळ आणि माथेरानकडे जाणाऱ्या मिनीट्रेन यांच्या स्थानकात उतरत आहे. त्यामुळे माथेरानकडे जाणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. त्या सरकत जिना उभारण्याच्या कामाला गती देण्यात यावी अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

# आदिवासींची घरे अन् जमीन टोरंटच्या घशात?

## ।। ९६ एकर जमीन ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर ।। लाखाचीवाडीकरांची प्रांत कार्यालयावर धडक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ज्या जमिनीवर आदिवासींची घरे, शेती आणि वर्षानुवर्षांची वहिवाट आहे, तीच जमीन टोरंट वीज कंपनीच्या प्रकल्पासाठी देण्यात आल्याने कर्जत तालुक्यात संतापाची ठिणगी पडली आहे. पाली तर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत हद्दीतील साई डोंगर भागात प्रस्तावित टोरंट पॉवरच्या जलविद्युत प्रकल्पासाठी शासनाच्या ताब्यातील सुमारे ९६ एकर जमीन ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर देण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. या जमिनीवर आदिवासींची घरे आणि शेती असल्याने 'आमची घरे मोडून प्रकल्प उभारू देणार नाही', असा आक्रमक पवित्रा घेत लाखाचीवाडीतील शंभरहून अधिक आदिवासींनी कर्जत प्रांत कार्यालयावर धडक दिली.



सावळे ग्रामपंचायत हद्दीतील लाखाचीवाडी येथील सर्व्हे क्रमांक १४ मधील गुरचरण जमीन टोरंट कंपनीला ३० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर देण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. याच परिसरात आदिवासी कुटुंबांची घरे असून, अनेक वर्षांपासून ते नाचणी, वरी तसेच पावसाळी कंदमुळांची लागवड करून उदरनिर्वाह करतात. सावळे ते कोठिंबे गावाकडे जाणारा रस्ताही याच क्षेत्रातून जात असल्याने या जमिनीचा प्रश्न केवळ घरांचा नसून आदिवासींच्या जगण्याचा आणि वहिवाटीचा प्रश्न असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

जमीन टोरंटला देण्यात आल्याची माहिती मिळताच लाखाचीवाडीतील ग्रामस्थांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख बाजीराव दळवी यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे यांच्यासह ग्रामस्थांनी कर्जत प्रशासकीय भवन गाठले. प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ यांना निवेदन देताना मनोहर वाघमारे, संजय हिलम, रघुनाथ वाघमारे, जिजाबाई सोमनाथ हिलम, सुरेश मुकणे, अमोल मुकणे, संजय मुकणे, नरेश पवार, प्रकाश वाघमारे यांच्यासह शंभरहून अधिक आदिवासी उपस्थित होते.

आदिवासींच्या घरांवर आणि शेतीवर गदा आणून प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न झाल्यास तो कदापि सहन केला जाणार नाही, असा इशारा ग्रामस्थांनी दिला.

दरम्यान, साई डोंगर प्रकल्पासाठी सुमारे ९३२ एकर जमीन लागणार असल्याचे सांगितले जात असून, त्यातील मोठा भाग वनक्षेत्राचा असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे. प्रकल्पामुळे हजारो झाडे, वन्यजीव आणि जैवविविधतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. सह्याद्री पर्वतरांग, भीमाशंकर अभयारण्य परिसर आणि कर्जतच्या पर्यावरणीय समतोलावरही परिणाम होऊ शकतो, असा आरोप पर्यावरणप्रेमी आणि ग्रामस्थांनी केला आहे.

> आमच्या पिढ्यान्‌पिढ्या या जमिनीवर घरे आणि शेती आहे. याच जमिनीवर आमचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. आमची घरे हटवून किंवा आम्हाला विस्थापित करून टोरंटचा प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न केला तर तो कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही.
> – लाखाचीवाडीतील आदिवासी ग्रामस्थ

त्यामुळे आदिवासींच्या हक्कांच्या जमिनीचा प्रश्न आणि पर्यावरणाचा मुद्दा एकाचवेळी ऐरणीवर आल्याने टोरंट प्रकल्पाविरोधातील आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

# पशुधन संवर्धनासाठी 'पशुधन विमा योजना'

## रायगडमधील पशुपालकांनी लाभ घेण्याचे आवाहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

हवामानातील बदल, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, विषबाधा, सर्पदंश, दूषित पाणी, अपघात तसेच लंपी स्किन डिसीज, घटसर्प यांसारख्या संसर्गजन्य आजारांमुळे पशुधन दगावल्यास पशुपालकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. ही आर्थिक जोखीम कमी करण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत 'पशुधन विमा योजना' रायगड जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पशुपालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन दुग्ध व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांनी केले.

या योजनेची माहिती देण्यासाठी शुक्रवारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे, पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त रत्नाकर काळे यांच्यासह पत्रकार उपस्थित होते. पशुधन दगावल्यामुळे पशुपालकांवर अचानक आर्थिक संकट कोसळते. अशा वेळी विमा संरक्षणाच्या माध्यमातून तातडीने नुकसानभरपाई मिळावी, पशुपालकांचे आर्थिक स्थैर्य टिकून राहावे आणि त्यांच्यावर कर्जबाजारी होण्याची वेळ येऊ नये, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे.या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत ॲग्रीकल्चरल इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड या कंपनीची निवड करण्यात आली आहे. योजनेंतर्गत देशी व संकरीत दुधाळ गायी, म्हशी, बैल, रेडे, शेळी आणि मेंढ्या यापैकी जास्तीत जास्त १० पशुधनाचा विमा काढता येणार आहे. दुभती गाय किंवा बैलासाठी कमाल ७० हजार रुपये, तर दुभती म्हैस किंवा रेड्यासाठी ८० हजार रुपये विमा संरक्षण मिळणार आहे. शेळी आणि मेंढीसाठी प्रत्येकी ७ हजार रुपये कमाल विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली आहे. पशुपालकांना एक, दोन किंवा तीन वर्षांच्या कालावधीसाठी विमा काढता येणार आहे. विम्याच्या हप्त्यात लाभार्थ्याचा हिस्सा केवळ १५ टक्के राहणार असून, उर्वरित ८५ टक्के हिस्सा केंद्र व राज्य शासनाकडून भरला जाणार आहे.

# 'स्मार्ट कार्ड'च्या नावाखाली प्रवाशांची आर्थिक लूट?

- **१९९ कार्ड मागणी २५० रुपयांची**
- **ज्येष्ठांच्या तक्रारीनंतर प्रकार उघडकीस**

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कॅशलेस प्रवासासाठी सुरू करण्यात आलेल्या नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड योजनेत श्रीवर्धन बसस्थानकात गैरप्रकार समोर आला आहे. शासकीय नियमानुसार १९९ रुपये शुल्क असलेल्या स्मार्ट कार्डसाठी 'एबिक्स कॅश' या खासगी कंपनीच्या कर्मचाऱ्याकडून प्रवाशांकडे २५० रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप आहे. ज्येष्ठ नागरिक चंद्रकांत भगत यांनी याबाबत आगारप्रमुख महिबूब मणेर यांच्याकडे तक्रार केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

कार्डासाठी अतिरिक्त ५० रुपये देण्यास नकार दिल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने 'केंद्र बंद करतो, तक्रार करायची असेल तर करा,' अशा शब्दांत प्रवाशांशी हुज्जत घातल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे बसस्थानकात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच आगारप्रमुख महिबूब मणेर यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित कर्मचाऱ्याची कानउघाडणी केली. तसेच कार्डासाठी २०० रुपयांपेक्षा अधिक रक्कम आकारू नये, अशा सूचना दिल्या. मात्र, यापूर्वीही या केंद्रावर सर्वच प्रवाशांकडून २५० रुपये घेतल्याचे समोर आले असून, काही प्रवाशांना केवळ २०० रुपयांची पावती देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

> कार्डासाठी अडीचशे रुपये देण्यास आम्ही नकार दिल्यानंतर केंद्रावरील कर्मचाऱ्याने 'मी शटर खाली करतोय, तुम्हाला काय करायचे असेल ते करा,' अशी धमकी दिली आणि केंद्र बंद केले. यावेळी आगारप्रमुखांनी मध्यस्थी केली. मात्र, कार्डासाठी नेमके किती शुल्क आहे, याचे अधिकृत परिपत्रक केंद्रावर स्पष्टपणे लावण्यात यावे.
> – चंद्रकांत भगत, ज्येष्ठ नागरिक, श्रीवर्धन

त्यामुळे अतिरिक्त घेतलेले ५० रुपये परत करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे. कार्ड मिळविण्यासाठी रांगेत तासनतास उभे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना या प्रकाराचा फटका बसत आहे. एसटी प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

# विद्यार्थिनी बनल्या पत्रकार

## छत्रीला बूम बनवून रस्त्याची मांडली व्यथा

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात कर्जत कोंदिवडे राज्यमार्ग रस्ता दरवर्षी प्रमाणे यावर्षीदेखील खड्ड्यात हरवला आहे. रस्त्यातील खड्ड्यांबाबत शालेय विद्यार्थिनींनी शासनाची टर ओढणारा व्हिडीओ बनवला आणि तो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.

कोंदिवडे भागातील दोन शालेय विद्यार्थिनी या आपल्या घरी निघाल्या होत्या. कोंदिवडे रस्त्यावरील खड्ड्यांमुळे त्यांना



दररोज चालतच प्रवास करावा लागतो. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनांचा प्रवास अलीकडेच थांबतो. त्यामुळे दररोज चालत जायचे आणि त्यात कधी एखादे वाहन आले तर अंगावर चिखल उडण्याची भीती असते.दररोजच्या खड्ड्यातून घरी जाण्याच्या प्रवासाला कंटाळत तीन मुलींनी एक व्हिडिओ बनवला. आपल्या हातातील छत्रीचा बूम म्हणून वापर केला आणि सोबतच्या मैत्रिणीला रस्त्याविषयी विचारले. त्या मुलीने हा हायवे असून, रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता असा प्रश्न करीत अत्यंत सराईत टीव्ही रिपोर्टरप्रमाणे रस्त्याची झालेली अवस्था आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात चित्रित केली. त्यामुळे हा सोशल मीडियावर अपलोड झालेला व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला आहे.

# सिमेंटच्या रस्त्याला सहा महिन्यात खड्डे

**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील बेलकडे ते सहाण बायपासदरम्यान रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. मागील सहा महिन्यांपासून एमएसआयडीसीकडून हे काम करण्यात येत आहे. परंतु, या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून, अपघात होण्याची शक्यता आहे. रस्त्याच्या कामाबाबत वाहनचालक आणि स्थानिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

नगरपरिषदेसह जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर | शहरात 'नो पार्किंग'चे फलक लावणार

# अलिबागची वाहतूक कोंडी फुटणार!

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि पार्किंगच्या समस्येवर अखेर प्रशासनाने गांभीर्याने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. शाळा भरण्या-सुटण्याच्या वेळेत होणारी वाहतूक कोंडी, जेएसडब्ल्यूच्या मोठ्या विद्युत बसगाड्यांमुळे निर्माण होणारा वाहतुकीचा अडथळा तसेच शहरातील बेशिस्त पार्किंगवर उपाययोजना करण्यासाठी नगरपरिषद, जिल्हा वाहतूक शाखा आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाची संयुक्त बैठक झाली. या बैठकीत शाळांच्या आवारातच वाहनतळाची व्यवस्था करण्याबरोबरच जेएसडब्ल्यूच्या बसगाड्यांसाठी शहराबाहेर स्वतंत्र थांबा निश्चित



करण्याचा निर्णय घेण्यात आला.

अलिबाग नगरपरिषदेच्या सभागृहात ७ ऑगस्ट रोजी झालेल्या या बैठकीस उपनगराध्यक्षा मानसी संतोष म्हात्रे, वीज व सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापती प्रशांत मधुसूदन नाईक, मुख्याधिकारी सागर संभाजी साळुंखे, उपप्रादेशिक परिवहन विभाग पेणचे अधिकारी स्वप्नील भोंग व अक्षय एस. खाडे, जिल्हा वाहतूक शाखेच्या एपीआय मीरा बी. लाड, प्रदीप झेमसे यांच्यासह शहरातील विविध शाळांचे प्रतिनिधी आणि जेएसडब्ल्यूचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अलिबाग शहरातील सेंट मेरी स्कूल, चेंढरे, अरुणकुमार वैद्य हायस्कूल आणि कन्याशाळा परिसरात शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याचे बैठकीत निदर्शनास आणण्यात आले. विशेषतः सेंट मेरी स्कूलमध्ये वाहनतळाची पुरेशी व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना सोडण्यासाठी व घेण्यासाठी येणारी वाहने रस्त्यावर उभी राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचे वाहतूक शाखेने स्पष्ट केले.

### वाहतूक आराखडा मंजुरीच्या प्रतीक्षेत

अलिबाग शहराचा वाहतूक आराखडा तयार करून मंजुरीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. मात्र या आराखड्याला अद्याप मंजुरी मिळालेली नसल्याने त्यानुसार वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करता येत नसल्याचे सभापती प्रशांत नाईक यांनी स्पष्ट केले. याप्रकरणी न.प. प्रशासन, जिल्हा वाहतूक शाखा आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक घेऊन वाहतूक आराखड्याच्या मंजुरीसाठी कार्यवाही करण्याची सूचना उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे यांनी केली.

# विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे धडे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

नढाळ येथील एच. डी. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट, पनवेल आणि रायगड तायक्कांदो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी मोफत स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या शिबिरात सुमारे ४०० ते ५०० विद्यार्थ्यांनी तायक्कांदोचे प्रशिक्षण घेतले.

कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका निशा पोलेकर यांच्या हस्ते झाले. विद्यार्थिनींना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच संकटाच्या प्रसंगी स्वतःचे संरक्षण करता यावे, आत्मविश्वास वाढावा आणि गुन्हेगारी प्रवृत्तींचा सामना करण्याचे बळ मिळावे, या उद्देशाने प्रशिक्षण देण्यात




आल्याचे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय पंच, सातवी डिग्री व मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल म्हात्रे, रूपेश माळी, अक्षता भगत, प्रसाद मुंडे, सानिका म्हात्रे व तनिस माळी यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. सुभाष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थिनींनी तायक्कांदोमध्ये राष्ट्रीय स्तरावर पदके मिळविल्याचेही यावेळी सांगण्यात आले. विशेष म्हणजे, शाळेतील सर्व शिक्षिकांनीही या प्रशिक्षणात सहभागी होऊन स्वसंरक्षणाचे धडे घेतले. जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी असे उपक्रम यापुढेही राबविण्यात येणार असल्याचे सुभाष पाटील यांनी सांगितले.

# पडीक जमिनी परत द्या; अन्यथा रोजगार द्या!

## । साळाव प्रकल्पग्रस्तांची महसूलमंत्र्यांकडे मागणी । ३२ वर्षांपासून जमिनी पडीक असल्याचा दावा

### भूसंपादन प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

विकासाच्या नावाखाली जमिनी घेतल्या; मात्र, वर्षानुवर्षे त्या जमिनी पडीकच राहिल्या. त्यामुळे शेतकरी भूमीहीन झाले आणि स्थानिकांच्या रोजगाराचा प्रश्नही कायम राहिला. या पार्श्वभूमीवर मुरुड तालुक्यातील साळाव येथील जे.एस.डब्ल्यू. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आता थेट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेत, पडीक जमिनी शेतकऱ्यांना परत द्या किंवा त्या ठिकाणी स्थानिक बेरोजगारांसाठी प्रकल्प उभा करा, अशी जोरदार मागणी केली आहे.

महसूलमंत्र्यांच्या रायगड दौऱ्यादरम्यान प्रकल्पग्रस्त शेतकरी व त्यांच्या प्रतिनिधींनी निवेदन देऊन साळाव परिसरातील भूसंपादनाचा फेरआढावा घेण्याची मागणी केली. विकासाच्या नावाने संपादित करून १५ वर्षांहून अधिक काळ पडीक असलेल्या जमिनींबाबत शासनाने फेरआढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याच्या पार्श्वभूमीवर साळावच्या शेतकऱ्यांनी आपला प्रश्न मांडला.

प्रकल्पग्रस्तांच्या म्हणण्यानुसार, सन १९८९-९० मध्ये सिकॉमच्या माध्यमातून साळाव परिसरातील जमीन संपादित करण्यात आली. त्यापैकी केवळ सुमारे ४० टक्के जमीन जे.एस.डब्ल्यू.च्या प्रकल्प व वसाहतीसाठी वापरण्यात आली असून, उर्वरित जमीन गेल्या ३२ वर्षांपासून पडीक असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर २००९-१० मध्ये वेलस्पन मॅक्स स्टीलच्या विस्तारासाठी सुमारे ३५० एकर जमीन संपादित करण्यात आली. ही जमीनही मागील १५ वर्षांपासून पडीक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पडीक जमिनींमुळे अनेक अल्पभूधारक शेतकरी भूमिहीन झाल्याचा आरोप असून, त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यातही अडचणी येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांच्या आधारे २००९-१० मधील भूसंपादन प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा दावा सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र सुतार यांनी केला आहे. भूसंपादन, शेतकऱ्यांना देण्यात आलेली भरपाई, शासनाला जमा झालेला महसूल तसेच संबंधित परवानग्या आणि प्रकल्प आराखड्याची सत्यता तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, साळाव येथील संबंधित सर्वे क्रमांक, कांदळवन कत्तली तसेच कंपनी परिसरातील शासकीय जमिनीवरील कथित अतिक्रमणाचीही चौकशी करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. ३२ वर्षे जमीन पडीक ठेवून शेतकऱ्यांना भूमिहीन करायचे आणि विकासही करायचा नाही, हे मान्य होणार नाही. जमीन वापरात नसेल तर ती मूळ शेतकऱ्यांना परत द्यावी; अन्यथा शासनाने स्थानिकांसाठी रोजगारनिर्मिती करणारा प्रकल्प उभारावा, अशी ठाम भूमिका प्रकल्पग्रस्तांनी घेतली आहे. यावेळी राजेंद्र सुतार, जितेंद्र गायकर, संतोष सुतार, दीपक रोटकर, राम सुतार, माधुरी मुंबईकर, रामचंद्र व्हयजेकर, हरिचंद्र मुंबईकर, जनार्दन रोटकर यांच्यासह प्रकल्पग्रस्त शेतकरी उपस्थित होते.



## उरणमध्ये दूषित पाण्याचा पुरवठा

- नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर
- अतिसारासह विविध आजारांची लागण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील अनेक गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून नळाद्वारे गढूळ व दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दूषित पाण्यामुळे नागरिकांना अतिसारासह विविध आजारांना सामोरे जावे लागत असून, लहान मुलांची संख्याही मोठी असल्याचे सांगितले जात आहे. अनेक नागरिक शासकीय तसेच खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेत आहेत.

चिरनेर, कळंबूसरे, मोठीजुई, खोपटा यांसह तालुक्यातील अन्य गावांमध्ये दूषित पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. सांडपाणी व कचऱ्याची योग्य विल्हेवाट होत नसल्याने पाण्याचे स्रोत दूषित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यातच काही ठिकाणी जलवाहिन्या गटारातून गेल्याने पाणीपुरवठ्यादरम्यान दूषित पाणी नळाला येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

गढूळ पाण्याबाबत नागरिकांनी संबंधित प्रशासन व पाणी समितीकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस उपाययोजना झाल्या नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळ्यातही काही गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याने प्रशासनाच्या नियोजनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दूषित पाण्यामुळे तालुक्यात साथीचे आजार पसरण्याची शक्यता लक्षात घेता सिडको पाणीपुरवठा विभाग, एमआयडीसी पाणीपुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिषद तसेच तालुका आरोग्य विभागाने तातडीने पाण्याचे नमुने तपासून दूषित पाणीपुरवठ्याचा स्रोत शोधावा आणि योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## राष्ट्र सेवा दलाचे नोव्हेंबरमध्ये पुण्यात संमेलन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राष्ट्र सेवा दलाच्या पुढाकाराने राष्ट्रीय पातळीवरील महात्मा फुले विचार साहित्य संमेलन पुण्यात २७,२८,२९ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार आहे. या संमेलनात देशभरातील विचारक, भाष्यकार, अभ्यासक, संशोधक, लेखक, कवी, संपादक, पत्रकार, प्राध्यापक, कलाकार, कृतीवंत, जेन झी आंदोलनातील देशभरातील विविध विद्यापीठांचे विद्यार्थी यांचा सहभाग असेल.

संमेलनात पुस्तक प्रदर्शन, जेन झी आंदोलनातील तरुणांच्या पोस्टरचे प्रदर्शन, तरुण व्यंगचित्रकारांच्या व्यंगचित्रांचे लाईव्ह प्रदर्शन, संविधान दालन, विविध विषयांवर टॉक शो, मुलाखती, व्याख्याने, नाटक, गाणी, कविता सादर होतील. लेखक, कवी आपल्या भेटीला हा विशेष उपक्रम प्रकाशकांच्या पुस्तक दालनात लक्ष वेधून घेईल.

महात्मा फुले जन्म द्विशताब्दी, महाड चवदार तळ्याची शताब्दी, मनुस्मृती दहन शताब्दी आणि राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या आरक्षणाची १२५ वर्षे या निमित्ताने राष्ट्र सेवा दल वर्षभर विषमता निर्मूलन निर्धार वर्षे देशभर साजरे करत आहे. त्याचा भाग म्हणून हे विचार, साहित्य, संस्कृती संमेलन होत आहे.

या संमेलनासाठी संमेलन समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यात लक्ष्मीकांत देशमुख, भारत सासणे, राजन गवस, प्रवीण बांदेकर, नीरज हातेकर, अलीम वकील, अरुण म्हात्रे, ज्ञानेश महाराव, निशिकांत कोलगे, आशालता कांबळे, विनोद शिरसाठ, लक्ष्मण यादव, हुबनाथ पांडे, प्रकाश दुबे, प्रदीप दाते, किशोर ढमाले, सुबोध मोरे, प्रतिमा परदेशी, सोमनाथ रोडे, सरफराज अहमद, सूरज येंगडे, जयवंत पाटील, अजित शिंदे, राजा कांदळकर तर विशेष निमंत्रित म्हणून कपिल पाटील, सुभाष वारे, अंजली आंबेडकर, अभिजित वैद्य, नितीन वैद्य यांचा समावेश आहे.

## तालुका ‘ओला-उबेर’साठी खुला करा

### पर्यटनवाढीसाठी भूमीपुत्र फार्म हाऊस संघटनेची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका पर्यटनाच्या नकाशावर वेगाने पुढे येत असून, स्थानिक शेतकऱ्यांनी उभारलेल्या दोन हजारांहून अधिक फार्म हाऊसमुळे पर्यटन व्यवसायाला चालना मिळाली आहे. मात्र पर्यटकांना ये-जा करण्यासाठी वाहनांची पुरेशी सुविधा उपलब्ध होत नसल्याने पर्यटन व्यवसायावर परिणाम होत असल्याचे सांगत कर्जत भूमिपुत्र फार्म हाऊस संघटनेने कर्जत तालुका ओला-उबेर सेवेसाठी पूर्णपणे खुला करण्याची मागणी केली आहे.

कर्जत तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शेतघरे पर्यटनासाठी खुली केली असून, त्यातून स्थानिक तरुणांना रोजगारही मिळत आहे. मात्र, पर्यटकांना रात्री-अपरात्री परतायचे असल्यास स्थानिक वाहने उपलब्ध होत नसल्याने त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. सध्या ओला-उबेर वाहनांना कर्जत तालुक्यात पर्यटकांना सोडण्याची मुभा असली, तरी येथून पर्यटकांना पुन्हा घेऊन जाण्याची सेवा उपलब्ध नसल्याने बाहेरून वाहने येत नाहीत.




या परिस्थितीमुळे पर्यटक कर्जतमध्ये अडकून पडण्याची शक्यता असून, त्याचा थेट परिणाम फार्म हाऊस व पर्यटन व्यवसायावर होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी ओला-उबेर वाहनांना कर्जत तालुक्यातून पर्यटक घेऊन जाण्याचीही परवानगी द्यावी, अशी मागणी भूमिपुत्र फार्म हाऊस संघटनेचे अध्यक्ष उदय पाटील यांनी केली आहे.

दरम्यान, बाहेरील वाहनांना संधी मिळण्याऐवजी कर्जत तालुक्यातील स्थानिक वाहनचालकांनीच ओला-उबेरसारख्या ऑनलाइन सेवांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेने केले आहे. स्थानिक वाहनचालकांनी ही सेवा स्वीकारल्यास पर्यटकांना चोवीस तास वाहतूक सुविधा मिळण्यासोबतच स्थानिक वाहनचालकांनाही रोजगार व व्यवसायाची मोठी संधी उपलब्ध होईल, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.

## अरुण शिवकर यांना तटकरेंकडून शुभेच्छा

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील सामाजिक कार्यासाठी कार्यरत असलेल्या साकव प्रकल्प सामाजिक संस्थेचे सचिव तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अरुण शिवकर यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस रविवारी (दि.९) साजरा करण्यात आला. या पार्श्वभूमीवर त्यांनी शनिवारी (दि.८) रायगडचे खा. सुनील तटकरे यांची सुतारवाडी येथील ‘गीताबाग’ कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी अरुण शिवकर यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा दिल्या.

## आरोग्य जनजागृती कार्यक्रम संपन्न

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

श्री. डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, नवीन पनवेल यांच्या एनएसएस युनिटतर्फे दि.८ ऑगस्ट रोजी दत्तक घेतलेल्या गावातील महिलांसाठी ‘‘जीवन व ध्यान’’, तसेच मानसिक आरोग्य जनजागृतीवर आधारित क्षेत्राधारित सामुदायिक सेवा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण महिलांमध्ये मानसिक आरोग्य, तणाव व्यवस्थापन, ध्यान, श्वसन तंत्र, मनःशांती आणि निरोगी जीवनशैली याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ. पंकज म्हात्रे यांनी केले. त्यांनी सहभागी महिलांना दैनंदिन जीवनात सहज करता येणाऱ्या सोप्या ध्यान व श्वसन तंत्रांचे मार्गदर्शन केले. तसेच, त्यांचा प्रत्यक्ष सराव करून घेतला. तणाव कमी करणे, मन एकाग्र ठेवणे आणि काम, कौटुंबिक जबाबदाऱ्या व वैयक्तिक जीवनामध्ये संतुलन राखण्याचे महत्त्व यावर संवादात्मक चर्चा करण्यात आली. महिलांना नियमित ध्यान व श्वसनाचा सराव करून मानसिक शांतता व सकारात्मक जीवनशैली अंगीकारण्यास प्रोत्साहित करण्यात आले. या कार्यक्रमात एकूण ५० ग्रामीण महिलांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमामुळे सहभागी महिलांमध्ये मानसिक आरोग्य, तणाव व्यवस्थापन आणि निरोगी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण झाली.

## देशमुख परिवाराचे महेंद्र घरत यांनी केले सांत्वन



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गव्हाण येथील ज्येष्ठ नागरिक सुभाष कृष्णाजी देशमुख (७०) यांचे नुकतेच निधन झाले. स्विय सहाय्यक ओम शेखर देशमुख यांचे ते काका होत. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच महेंद्र घरत यांनी त्यांचा लंडन दौरा संपताच गव्हाण येथील देशमुख कुटुंबियांच्या राहत्या घरी जाऊन त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले. यावेळी त्यांच्यासमवेत गुलाब घरत, भाऊ पाटील आदी उपस्थित होते. सुभाष देशमुख यांचे उत्तरकार्य मंगळवारी (दि.११) गव्हाण येथे होणार आहे.

## फळबाग लागवडीतून शाश्वत उत्पन्न वाढवा

- मंत्री भरत गोगावलेंचे शेतकऱ्यांना आवाहन



**। महाड । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत फळबाग लागवडीसारख्या शाश्वत पर्यायांचा स्वीकार केल्यास त्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होऊ शकते, असा विश्वास रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केला. महाड तालुक्यात कृषी विभागाच्या ‘मागेल त्याला काजू’ योजनेंतर्गत तसेच व्हीबीजी-रामजी (विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान) अंतर्गत काजू व आंबा घन लागवड उपक्रमाचा शुभारंभ मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आला.

विन्हेरे येथील शेतकरी किशोर नारायण फाळके यांच्या शेतावर ०.२० हेक्टर क्षेत्रात सीआरए तंत्रज्ञानाच्या माध्यमातून काजू लागवडीचा शुभारंभ करण्यात आला. तसेच नातोंडी येथील शेतकरी ज्ञानेश्वर सोनकर यांच्या शेतावर ०.२५ हेक्टर क्षेत्रात आंबा घन लागवडीला सुरुवात करण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य निलेश ताठरे, पंचायत समिती सभापती श्रीमती सावंत, पंचायत समिती सदस्य खिडबिडे, म. माने, उपविभागीय कृषी अधिकारी खटकळे, तहसीलदार शितोळे, तालुका कृषी अधिकारी यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना मिळणार शुद्ध पाणी

### सायरस मिस्त्री फाऊंडेशनकडून शाळांना ‘एक्कागार्ड’ची भेट

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

सायरस मिस्त्री फाऊंडेशनच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत गागोदे बुद्रुक केंद्रातील वाक्रुळ ग्रामपंचायत हद्दीतील सात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना ‘एक्कागार्ड’ भेट देण्यात आले. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना आता शुद्ध, सुरक्षित आणि आरोग्यदायी पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे.




रायगड जिल्हा परिषद शाळा पानेड, वाक्रुळ, निंबारवाडी, खरबाचीवाडी, म्हैसकोंड, राजमाची आणि काटीचीवाडी या सात शाळांमध्ये एक्कागार्ड बसविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून, शिक्षणाबरोबरच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा आदर्श यामुळे निर्माण झाला आहे.

हा उपक्रम शाळांपर्यंत पोहोचविण्यासाठी वाक्रुळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गणेश गायकर यांनी सातत्याने पाठपुरावा करून विशेष प्रयत्न केले. त्यांच्या या योगदानाबद्दल सातही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम इतर सामाजिक संस्था आणि उद्योगांसाठीही प्रेरणादायी ठरत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## खालापूरमध्ये शेतकऱ्यांचा सन्मान

**पाताळगंगा :** स्वामिनी प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा कांचन जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त खालापूर तालुक्यातील प्रगतीशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. औद्योगिकीकरणाचा वाढता विस्तार होत असतानाही शेतीची परंपरा जपत आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय खतांचा वापर, विविध पिकांची लागवड आणि नवनवीन प्रयोग करणारे कानिफनाथ पारठे, शिवाजी ठाकूर यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला आ. महेंद्र थोरवे, नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांचा समाजासमोर आदर्श

### खाऊचे पैसे वाचवत आदिवासी बांधवांना दिले गृहोपयोगी साहित्य

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

कार्मेल कॉन्व्हेंट स्कूल खोपोलीच्या स्काऊट अँड गाईड तुकडीतील तब्बल १६० विद्यार्थ्यांनी लौजी गावात समाजसेवा, पर्यावरण संवर्धन आणि वर्षासहलीचा अनोखा उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या खाऊसाठी मिळणारे पैसे वाचवून आदिवासी कुटुंबांसाठी गृहपयोगी साहित्य खरेदी केले. तसेच, स्वतःच्या घरातून वापरण्यायोग्य कपडे संकलित करून त्यांचे आदिवासी बांधवांना वाटप केले.

लौजीच्या निसर्गरम्य परिसरात झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणही केले. सॅनियो स्पेशल स्टील कंपनीच्या सहकार्याने फळझाडे, फुलझाडे आणि विविध देशी वृक्षांची रोपे उपलब्ध करून देण्यात आली. ‘एक पॅट्रोल एक वृक्ष’ हा संदेश देत विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला. यावेळी विद्यार्थ्यांनी लौजी गावातील ऐतिहासिक विहिरीला भेट देऊन स्थानिक इतिहास, जलसंवर्धन आणि पारंपरिक जलव्यवस्थापनाची माहिती घेतली. त्यानंतर वर्षा सहलीचा आनंद घेत विद्यार्थ्यांनी शिस्त, सांघिक भावना आणि निसर्गप्रेमाचा अनुभव घेतला. हेल्प फाऊंडेशन, खोपोलीचे संस्थापक गुरुनाथ साठेलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

### सी.एन. पाटील यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस साजरा | पुष्पवृष्टी करून जल्लोषात स्वागत

## माजी विद्यार्थ्यांकडून गुरुंचा यथोचित सन्मान

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या जनता हायस्कूल, गडब येथे सन १९८० ते १९८५ या कालावधीत अध्यापन करणारे निवृत्त शिक्षक चारुदत्त (सी. एन.) पाटील यांचा ७५वा वाढदिवस माजी विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला.

मूळचे अलिबाग तालुक्यातील शहाबाज-धामनपाडा येथील असलेले सी.एन. पाटील हे सध्या पेण येथे वास्तव्यास आहेत. त्यांनी इंग्रजी व भूगोल विषयाचे अध्यापन केले. शिस्तप्रिय असलेले पाटील यांनी विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच दिले नाही, तर विनोदी आणि प्रेमळ शैलीत त्यांच्यावर संस्कारही केले. त्या काळात विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याची पद्धत प्रचलित असतानाही त्यांनी विद्यार्थ्यांना न मारता समजावून शिस्त लावली.



जनता हायस्कूल गडब, जिते तसेच साई विद्यालयात त्यांनी ज्ञानदान केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिकलेले अनेक विद्यार्थी आज शिक्षक, वकील, पोलीस, पत्रकार, शासकीय अधिकारी, अभियंते अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. आपल्या लाडक्या शिक्षकाचा ७५वा वाढदिवस साजरा करण्यासाठी मुंबई, पुणे, सातारा, सांगली इत्यादी ठिकाणांहून माजी विद्यार्थी आवर्जून पेण येथे दाखल झाले होते.

माजी विद्यार्थ्यांनी पुष्पवृष्टी करून पाटील यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. त्यांची कन्या आकांक्षा योगेश पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी पाटील यांचे नातेवाईक, माजी विद्यार्थी व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना सी.एन. पाटील भावुक झाले. ‘‘माझे आयुष्य सार्थकी लागले. आपण जे ज्ञान पेरले होते, ते आज आपल्यासमोर उभे आहे,’’ अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स
मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## निवडक



### सार्थक चव्हाण विजेतेपदाचा दावेदार

**पुणे** : इंडोनेशियामध्ये होणाऱ्या एशिया रोड रेसिंग चॅम्पियनशीप स्पर्धेच्या ङ्गटीव्हीएस रेसिंग इंटरनॅशनल चॅम्पियनशीपफ या श्रेणीमध्ये पुण्यातील १९ वर्षीय आणि टिव्हीएस रेसिंग संघाचा सार्थक चव्हाण मौसमातील दुसऱ्या फेरीच्या रेसमध्ये विजेतेपदाचा दावेदार समजला जात आहे. थायलंमधील दुसऱ्या फेरीत सार्थकने विजेतेपदाला गवणसी घातली होती. स्पर्धेत तीन वेळेस विजेतेपद मिळवणारा सार्थक हा एकमेव भारतीय रेसिंगपटू ठरला होता. हि चौथी फेरी रविवार, ९ ऑगस्ट रोजी होणार आहे.स्पर्धेच्या मलेशियातील मौसमाच्या पहिल्याच फेरीमध्ये सार्थक पोडीयम विजेता ठरला होता. त्यानंतर मे महिन्यामध्ये थायलंडम धील बुरिराम येथील चांग इंटरनॅशनल सर्किट येथे झालेल्या स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत विजेतेपदाचा प्रमुख दावेदार ठरलेल्या सार्थक याने आपल्या कामगिरीने आपला दावा सार्थ करून दाखविला. आता इंडोनेशियामध्ये चौथ्या फेरीसाठी सार्थक सज्ज झाला आहे.लढतीआधी बोलताना सार्थक म्हणाला की, दुसऱ्या फेरीतील विजेतेपदामुळे माझ्यावरील जबाबदारी अधिक वाढली आहे. तिसऱ्या फेरीत सहभागी झालो नाही कारण मी स्पेनमध्ये आणि फ्रान्स्मध्ये झालेल्या एफआयएम मोटोज्युनिअर जागतिक अजिंक्यपद शर्यतीमध्ये सहभागी होतो. आता मला पुन्हा एकदा उत्तम कामगिरी करायची आहे पण, त्याचे मला कोणत्याही प्रकारचे दडपण जाणवत नाही.



### कॅरम स्पर्धेत पुणेकरांचा डंका!

**पुणे** : सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने व माजी आमदार कै. विनायक निम्हण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विनायकी क्रीडा महोत्सवाअंतर्गत राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत दुसऱ्या फेरीत अभिजीत त्रिपणकर, आयुष गरुड, दिनेश केदार यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन व कॅरम असोसिएशन ऑफ पुणे यांच्या मान्यतेने व झेनेटीक स्पोर्ट्सच्या सहकार्याने होत असलेल्या सनी स्पोर्ट्स किंगडम, सनिज वर्ल्ड, पाषाण सुस रोड, पुणे येथे सुरू झालेल्या या स्पर्धेत दुसऱ्या फेरीत जागतिक विजेत्या पुण्याच्या अभिजीत त्रिपणकर याने आपला शहर सहकारी विघ्नेश कोर्बोल्लूचा २५-००, २५-०० असा एकतर्फी पराभव केला. पुण्याच्या आयुष गरुडने छत्रपती संभाजी नगरच्या सचिन केळकरचा २५-००, २५-०६ असा तर, मुंबईच्या दिनेश केदार याने मुंबई उपनगराच्या सुधाकर अय्यरचा २५-०५, २५-०४ असा पराभव करून आगेकूच केली. याआधी स्पर्धेचे उद्घाटन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सचिव संदीप कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे सचिव अरुण कदम, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे चेअरमन व कॅरम असोसिएशन ऑफ पुणेचे अध्यक्ष भारत देसलडा, यतीन ठाकूर, जयवंत नलावडे, खजिनदार अजित सावंत, सुशील गुजर, आशुतोष दोडमिसे, एम सीएचे उपाध्यक्ष मंजूर खान, स्पर्धा समन्वयक अभिजीत मोहिते, नरेंद्र पाटणकर रेफ्री केतन चिखले, आशिष बागकर आदी उपस्थित होते.

### अफगाणिस्तानची वर्ल्ड कपमध्ये एन्ट्री

**नवी दिल्ली** : वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेचं स्वरूप कसं असेल या बाबत आयसीसीने आधीच जाहीर केलं आहे. आता या स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या संघाची नावंही जाहीर होत आहे. असं असताना अफगाणिस्तानने या वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेत एन्ट्री मारली आहे. अफगाणिस्तानने वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेसाठी अधिकृतरित्या प्रवेश केला आहे.अफगाणिस्तानने आयर्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेदरम्यान वनडे वर्ल्डकप स्पर्धेचं तिकीट पक्कं केलं आहे. अफगाणिस्तान आणि आयर्लंड यांच्यात पाच सामन्यांची वनडे मालिका होत आहे. या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. एकही चेंडू या सामन्यात टाकला गेला नाही. तर दुसऱ्या वनडे सामन्यात अफगाणिस्तानने आयर्लंडला ९२ धावांनी लोळवलं. या विजयासह अफगाणिस्तानला वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेचं तिकीट मिळालं. तर आयर्लंडच्या थेट पात्रतेच्या आशा संपुष्टात आल्या आहेत. आयसीसी वनडे रँकिंगमध्ये आयर्लंडचा संघ १२व्या स्थानावर आहे.

# भारताच्या भूमीवर ऑस्ट्रेलियाची कसोटी

- **पाच कसोटी सामन्यांची मालिका**
- **नागपुरात पहिला कसोटी सामना**



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारत आणि ऑस्ट्रेलिया मालिकेचा थरार पुन्हा एकदा रंगणार आहे. ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट संघ पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारताचा दौरा करणार आहे. २०२५- २०२७ च्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिप फेरीसाठी ही मालिका महत्वाची असणार आहे.

टीम इंडिया सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. जिथे दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना १५ ऑगस्टपासून गॉल येथे खेळला जाईल.तर, दुसरा कसोटी सामना २३ ऑगस्टपासून सिंहलीज स्पोर्ट्स क्लब मैदानावर खेळला जाईल.

ऑस्ट्रेलियाचा भारत दौरा जानेवारी २०२७ मध्ये नियोजित आहे. ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्या ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. याची सुरुवात नागपूर येथे होईल. पहिला कसोटी सामन्याला २१ जानेवारीपासून सुरुवात होईल.

हा सामना नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळला जाईल. भारताने या मैदानावर सात कसोटी सामने खेळले आहे. यात त्यांनी पाच सामने जिंकले आहेत तर एका सामन्यात पराभव पत्करावा लागला आहे.

### चेन्नईमध्ये रंगणार दुसरी कसोटी

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा कसोटी सामना २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान चेन्नई येथील एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर खेळला जाईल. हे मैदान एक ऐतिहासिक ठिकाण असून, भारताने येथे ३५ कसोटी सामने खेळले आहेत. यापैकी भारताने १६ कसोटी सामने जिंकले असून सात गमावले आहेत.

**शेवटची कसोटी अहमदाबादमध्ये**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसरा कसोटी सामना ११ ते १५ फेब्रुवारी दरम्यान गुवाहाटी येथील डॉ. भूपेन हजारिका क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाईल. या मैदानावर खेळली गेलेली एकमेव कसोटी गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होती, ज्यात भारताचा पराभव झाला होता.

चौथी कसोटी रांचीमध्ये खेळवली जाईल. हा सामना १९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान झारखंड स्टेट क्रिकेट असोसिएशन इंटरनॅशनल स्टेडियमवर आयोजित केला जाईल. भारताने या मैदानावर तीन कसोटी सामने खेळले असून, त्यापैकी दोन जिंकले आहेत आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धचा एक सामना अनिर्णित राहिला आहे.

मालिकेतील पाचवा आणि अंतिम कसोटी सामना २७ फेब्रुवारी ते ३ मार्च दरम्यान अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाईल. भारताने या मैदानावर १६ कसोटी सामने खेळले असून, त्यापैकी १० सामने अनिर्णित राहिले आहेत. भारताने चार सामने जिंकले असून दोन गमावले आहेत.

## अंडर २० वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा

## शाहनवाज खानला लांब उडीत कांस्य

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय ऍथलीट शाहनवाज खानने रविवारी अमेरिकेतील यूजीन येथे सुरू असलेल्या अंडर-२० वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या लांब उडीत कांस्यपदक जिंकले. त्याने अंतिम फेरीत तिसऱ्या प्रयत्नात ७.८४ मीटरची उडी मारून पोडियम स्थान मिळवले. १८ वर्षीय शाहनवाज या चॅम्पियनशिपमध्ये पदक जिंकणारा तिसरा भारतीय आहे. त्याच्या आधी शनिवारी आशिष यादवने भालाफेकीत आणि बासंत कुमार मेघवालने उंच उडीत रौप्यपदक जिंकले होते.



फेडरेशनने पुढे लिहिले की, ही एक संघर्षपूर्ण स्पर्धा होती. सुरुवातीला मागे पडल्यानंतर शाहनवाजने पूर्ण ताकद लावली. त्याने तिसऱ्या फेरीत शानदार ७.८४ मीटरची उडी मारली आणि पाचव्या फेरीत ७.८३ मीटरसह ती मजबूत केली .इटलीच्या इंझोलीने ७.९७मीटरच्या उडीसह सुवर्णपदक आणि ऑस्ट्रेलियाच्या मॅकग्रोडरने ७.९६ मीटरसह रौप्यपदक जिंकले. यापूर्वी बासंत कुमार मेघवालने उंच उडीत आपल्या सर्वोत्तम कामगिरीसह रौप्यपदक जिंकले होते. राजस्थानमधील श्रीगंगानगर जिल्ह्यातील अनुपगढ शहराच्या १९ वर्षीय मेघवालने २.२१ मीटर उंची पार केली होती. त्याने चॅम्पियनशिपच्या चौथ्या आणि अंतिम दिवसाच्या एक दिवस आधी शनिवारी ही कामगिरी केली. ही २.२१ मीटरची उडी त्याच्या कारकिर्दीतील आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी होती. अल्जेरियाच्या युनेस अयाचीने सुवर्णपदक आणि ग्रेट ब्रिटनच्या ओटिस पूलने कांस्यपदक जिंकले.

### लिओनेल मेस्सीला पितृशोक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लिओनेल मेस्सीचे वडील जॉर्ज मेस्सी यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी निधन झाले. ते बऱ्याच काळापासून आजारी होते. गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते.मेस्सीच्या बालपणीच्या क्लब न्यूवेल्स ओल्ड बॉईजने शनिवारी त्यांच्या निधनाची पुष्टी केली. क्लबने शोक व्यक्त करत त्यांना मेस्सीच्या कारकिर्दीतील सर्वात मोठी ताकद म्हटले.जॉर्ज फक्त मेस्सीचे वडील नव्हते. ते दोन दशकांहून अधिक काळ त्यांचे एजंट आणि सल्लागारही होते. बार्सिलोना, आणि इंटर मियामी सारख्या क्लब हस्तांतरणांमध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका होती. न्यूवेल्स ओल्ड बॉईजने श्रद्धांजली म्हणून क्लबचा ध्वज अर्धा खाली उतरवला.

## ऋषभ पंतला उत्तराखंडमध्ये सरकार जमीन देणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



भारतीय यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत यांची उत्तराखंडमध्ये जमीन खरेदी करण्याची इच्छा आता पूर्ण होऊ शकते. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी पंत यांच्या विनंतीला प्रतिसाद देत ते उत्तराखंडचे सुपुत्र असून सरकार त्यांना सर्वतोपरी मदत करेल असे सांगितले.

यापूर्वी पंत यांनी सोशल मीडियावर लिहिले होते की, ते गेल्या तीन वर्षांपासून जमीन खरेदी करण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु अद्याप यशस्वी होऊ शकले नाहीत.पंत हे आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी उत्तराखंडमध्ये सर्वाधिक कर भरणारे व्यक्ती आहेत. अहवालानुसार, त्यांनी २३.८४ कोटी रुपयांचा आयकर भरला होता. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले, जो कोणी उत्तराखंडमध्ये येऊ इच्छितो, त्याचे स्वागत आहे. पंत आपल्या राज्याचे आहेत. त्यांनी क्रिकेटमध्ये देशाचे आणि उत्तराखंडचे नाव उज्ज्वल केले आहे. अधिकारी त्यांच्याशी बोलतील आणि गरज पडल्यास सर्वतोपरी मदत केली जाईल.

## भारत-बांग्लादेश मालिकेला राजकीय ग्रहण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गेल्या दोन वर्षात भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशांमधील राजकीय तणाव वाढला आहे. याचा परिणाम भारत-बांगलादेश क्रिकेट संबंधांवरही झाला आहे. यामुळेच भारतीय संघाचा बांग्लादेश दौरा दोन वर्षांपासून रखडला आहे.

यावर्षी सप्टेंबरमध्ये हा दौरा आयोजित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु आता बांग्लादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या पत्रकार परिषदेमुळे मालिकेचे भवितव्य पुन्हा धोक्यात आले आहे.

माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या नवी दिल्लीतील पत्रकार परिषदेने हा वाद अधिकच वाढला आहे. ५ ऑगस्ट रोजी झालेल्या या पत्रकार परिषदेत हसीना यांनी डिसेंबरमध्ये आपल्या देशात परतण्याची घोषणा केली. मात्र, त्यानंतर बांगलादेश सरकारने दिलेल्या तीव्र प्रतिक्रियेमुळे हे प्रकरण अधिकच चिघळले.

बांग्लादेशचे गृहमंत्री सलाहुद्दीन अहमद यांनी ८ ऑगस्ट रोजी भारतावर निशाणा साधत म्हटले की, जर शेख हसीना दिल्लीतून अशी वक्तव्ये करत असतील ज्यामुळे बांग्लादेशच्या लोकशाहीला धोका निर्माण होतो आणि देशात अस्थिरता निर्माण होते, तर भारत बांग्लादेशसोबत मैत्रीपूर्ण संबंधांची अपेक्षा करू शकत नाही.

फेब्रुवारीमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये बांग्लादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या विजयानंतर भारत-बांगलादेश क्रिकेट संबंध सुधारण्याच्या आशा वाढल्या होत्या. सध्याचे बीसीबी अध्यक्ष तमीम इक्बाल हे देखील भारताला यजमानपद मिळावे यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करत होते.

बांग्लादेश बोर्डाचे अध्यक्ष तमीम इक्बाल ही मालिका आयोजित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. त्यांनी अलीकडेच बांगलादेशच्या परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्र्यांची भेट घेतली आणि भारताला दौऱ्यासाठी राजी करण्याचे आवाहन सरकारला केले.

## साई सुदर्शन श्रीलंका कसोटी मालिकेतून बाहेर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय फलंदाज साई सुदर्शन दुखापतीमुळे श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतून बाहेर पडला आहे. डाव्या पायाच्या अंगठ्याच्या दुखापतीतून पूर्णपणे बरा न झाल्यामुळे, बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्याला कसोटी क्रिकेटमध्ये परतण्याची परवानगी दिली नाही. त्याच्या जागी देवदत्त पडिक्कल पहिल्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर खेळण्याची शक्यता आहे.



भारत आणि श्रीलंका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांची मालिका १५ ऑगस्टपासून गॉल येथे सुरू होईल. दुसरा कसोटी सामना २३ ऑगस्टपासून कोलंबो येथील एसएससी मैदानावर खेळला जाईल. ही मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ चा भाग आहे.


साई सुदर्शनला गेल्या महिन्यात श्रीलंका-ए विरुद्धच्या दुसऱ्या अनऑफिशियल कसोटी सामन्यादरम्यान पायाच्या अंगठ्याला दुखापत झाली होती. त्यानंतर तो बंगळूरु येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पुनर्वसन करत होता. त्याने फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाचा सरावही सुरू केला होता, पण वैद्यकीय पथकाने त्याला पूर्णपणे तंदुरुस्त मानले नाही.

सुदर्शनच्या अनुपस्थितीत देवदत्त पडिक्कल पहिल्या कसोटीत नंबर-३ वर फलंदाजी करेल. पडिक्कलने कोलंबोमध्ये श्रीलंका इलेव्हनविरुद्धच्या तीन दिवसीय सराव सामन्यात शतक ठोकून आपली दावेदारी मजबूत केली आहे.

श्रीलंका दौऱ्यापूर्वीच भारतीय संघ अनेक दुखापतींनी त्रस्त आहे. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह गुडघ्याच्या दुखापतीमुळे संपूर्ण कसोटी मालिकेतून बाहेर पडले आहेत. वॉशिंग्टन सुंदर हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे पहिली कसोटी खेळणार नाहीत. हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी आणि आकाश दीप हे देखील उपलब्ध नाहीत. तर कसोटी कर्णधार शुभमन गिलच्या उजव्या हाताला दुखापत झाली आहे. खबरदारी म्हणून त्यांनी सराव सामना खेळला नाही आणि बीसीसीआयची वैद्यकीय टीम त्यांच्यावर लक्ष ठेवून आहे.

साई सुदर्शनने आतापर्यंत भारतासाठी ७ कसोटी, ३ एकदिवसीय आणि १ टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये त्याने १२ डावांमध्ये ३१.९१ च्या सरासरीने ३८३ धावा केल्या आहेत, ज्यात तीन अर्धशतकांचा समावेश आहे. तर एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याने तीन सामन्यांच्या तीन डावांमध्ये १२७ धावा केल्या आहेत. या काळात त्याची सरासरी ६३.५० होती आणि त्याने दोन अर्धशतके झळकावली.

### रोहित देसाईला विजेतेपद



**पुणे** : पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेतर्फे आयोजित व माजी टेबल टेनिसपटू यांच्या वतीने पुरस्कृत बालु ऑटोमेशन प्लेअर्स कप २०२६ पुणे जिल्हा टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत ४० वर्षांवरील पुरुष गटात रोहित देसाई याने विजेतेपद संपादन केले. पुण्यातील शारदा स्पोर्ट्स सेंटर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत रोहित देसाई याने सुयोग पाटीलचा पराभव करून विजेतेपद पटकावले. १५ वर्षांखालील मुलांच्या गटात दुसऱ्या फेरीत अव्वल मानांकित शारंग गवळीने साहिल भोरकरचा तर, आठव्या मानांकित नीरव मुळ्येने ध्रुव अग्रवालचा पराभव करून आगेकूच केली. चौथ्या मानांकित आर्यन वानखेडे याने अयान दाभोळकरवर ११-४, ११-३, ११-२ असा विजय मिळवला.

**चीनच्या खेळाडूला हरवले | भारताचे दुसरे विजेतेपद**

## अश्मिता चालिह 'कोरिया मास्टर्स'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय बॅडमिंटन खेळाडू अश्मिता चालिहाने रविवारी कोरिया मास्टर्स सुपर ३०० महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले. तिने ५३ मिनिटे चाललेल्या अंतिम सामन्यात चीनच्या चौथ्या मानांकित हान कियान शीला हरवले. तिने १४-२१, २१-१४, २१-१४ अशा फरकाने विजय मिळवून आपले पहिले वर्ल्ड टूर विजेतेपद जिंकले.भारताने सलग दुसरे वर्ल्ड टूर फायनलचे विजेतेपद पटकावले. यापूर्वी तन्वी शर्माने गेल्या रविवारी म्हणजेच २ ऑगस्ट रोजी चायपे ओपन जिंकले होते.



अश्मिताने सामन्याच्या सुरुवातीला ३-० अशी आघाडी घेतली. ती सुरुवातीच्या फेरीत ९-५ ने पुढे होती. यानंतर हानने पुनरागमन केले आणि दोन्ही खेळाडू ११-११ च्या बरोबरीत पोहोचल्या. चीनी खेळाडूने सलग गुण मिळवून खेळावर नियंत्रण मिळवले. हानने पहिला गेम जिंकून आघाडी घेतली.अश्मिताने दुसऱ्या गेममध्ये आक्रमक खेळ दाखवला. तिने स्मॅशने हानवर दबाव आणला आणि वेगवान बचावात्मक रिटर्न्सने ६-६ नंतर आघाडी घेतली. ब्रेकच्या वेळी अश्मिता ११-८ ने पुढे होती. यानंतरही तिने रॅलींवर नियंत्रण ठेवले.हानला अंतर कमी करता आले नाही आणि अश्मिता १७-१० ने पुढे गेली. भारतीय खेळाडूने आणखी एका वेगवान अटॅकिंग शॉटसह गेम २१-१४ ने जिंकून सामना बरोबरीत आणला.

अंतिम गेमच्या सुरुवातीला दोन्ही खेळाडूंमध्ये कडवी झुंज झाली. अश्मिताने ५-२ ची आघाडी घेतली, पण मिड-गेम ब्रेकपर्यंत हान ११-९ ने पुढे गेली. अश्मिताने वापसी करत लाईनच्या कडेला शॉट मारून १२-११ ची आघाडी घेतली. यानंतर अश्मिता गेममध्ये सतत पुढे राहिली. तिने हानच्या कोर्टमधील रिकाम्या जागांचा फायदा घेतला आणि स्कोअर १९-१४ केला.हानचा रिटर्न बाहेर गेल्यावर अश्मिताला शेवटचा गुण मिळाला. यासोबतच तिने चॅम्पियनशिप जिंकली.

२०२४ मध्ये कोरिया ओपनदरम्यान अश्मिताच्या उजव्या गुडघ्यातील मेडियल मेनिस्कसला दुखापत झाली होती. त्यानंतर तिची शस्त्रक्रिया झाली आणि तिने दीर्घकाळ पुनर्वसन केले. पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये ती परतली आणि १४ स्पर्धांमध्ये खेळली.

## प्रेक्षकांना मोफत प्रवेश

- **श्रीलंका क्रिकेट बोर्डाचा निर्णय**
- **१५ ऑगस्ट रोजी गॉलमध्ये पहिला कसोटी सामना रंगणार**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील कसोटी मालिकेत प्रेक्षकांना मोफत प्रवेश मिळेल. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने अधिसूचना जारी करून ही घोषणा केली आहे. भारत या मालिकेत दोन कसोटी सामने खेळणार आहे.

पहिला सामना १५ ऑगस्टपासून गॉलमध्ये, तर दुसरा सामना २३ ऑगस्टपासून कोलंबोमध्ये खेळला जाईल. गॉल आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये प्रेक्षकांना गेट क्रमांक-४ मधून मोफत प्रवेश मिळेल. कोलंबोच्या मैदानावर गेट क्रमांक ३, ४, ५ आणि ७ मधून विनातिकीट प्रवेश दिला जाईल. बोर्डाने प्रेक्षकांना मोठ्या संख्येने सामना पाहण्यासाठी येण्याचे आवाहन केले आहे.

उपखंडात गेल्या काही वर्षांपासून प्रेक्षक कसोटी सामने पाहण्यासाठी स्टेडियममध्ये येत नाहीत. श्रीलंकेच्या भारताच्या मागील दौऱ्यात आणि याच वर्षी झालेल्या भारत-अफगाणिस्तान कसोटीतही गर्दी झाली नव्हती. याच कारणामुळे श्रीलंका बोर्डाने हा पुढाकार घेतला आहे.भारत सध्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप पॉइंट्स टेबलमध्ये पाचव्या स्थानावर आहे. श्रीलंका सहाव्या स्थानावर आहे.

### दोन कसोटी सामन्यांचे आयोजन

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या दृष्टीने दोन्ही संघांसाठी ही मालिका जिंकणे महत्त्वाचे आहे. भारताने २०१७ मध्ये श्रीलंकेच्या मागील कसोटी दौऱ्यावर ३-० ने मालिका जिंकली होती. संघाने गॉलमध्ये ३०४ धावांनी, कोलंबोमध्ये एक डाव आणि ५३ धावांनी विजय मिळवला होता. त्यानंतर पल्लेकेलेमध्ये श्रीलंकेला एक डाव आणि १७१ धावांनी हरवले.श्रीलंका मागील मालिका हरून येत आहे. संघाला वेस्ट इंडिजविरुद्धच्या २ सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० ने पराभव पत्करावा लागला होता.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)